
शिकण्याच्या वाटेवरचं
आनंदवन
फारूक काझी

# शिकण्याच्या वाटेवरचं...

# आनंदवन

फारुक एस. काझी

Shikshanachya Vatevarche... Anandwan
Faruk S. Kazi
शिकण्याच्या वाटेवरचं आनंदवन..... फारुक एस. काझी

© फारुक एस. काझी
नाझरा, ता. सांगोला, जि. सोलापूर
मो. ९९२१३८०९६६

पहिली आवृत्ती
२८ नोव्हेंबर, २०१४
म. फुले पुण्यतिथी

प्रकाशक
एकनाथ पांडुरंग गुरव
'अंकुर', सांगोला - ४१३३०७
ankurguru125@gmail.com

मुखपृष्ठ व आतील चित्रे
सीताराम पाटील, सांगोला

मुद्रक
भारती मुद्रणालय
शाहूपुरी ४ थी गल्ली,
कोल्हापूर - ४१६००१..

किंमत : रू. १००



शिकण्याच्या वाटेवरच्या
आनंदवनात
ज्यांना कधीच जाता आलं नाही...
त्या लेकरांना...

## हितगुज

### आनंदवनातले दिवस !

आपल्या देशातल्या शाळांशाळांतून शिकणाऱ्या अब्जावधी मुलांना शिकवायला काही लक्ष शिक्षक नेमलेले आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत ग्रामीण, आदिवासी, डोंगराळ, दुर्गम भागात ते शिक्षणाचे काम करीत असतात.... शिक्षणाबरोबरच अनेक प्रकारची अशैक्षणिक कामे इथल्या व्यवस्थेने शिक्षकांमागे लावून दिली आहेत. या सगळ्यात शिक्षकाला प्रत्यक्ष शिकवण्यासाठी किती वेळ मिळतो? हा संशोधनाचा विषय ठरावा! शिक्षकांना एक्स्पोझर नाही. आवश्यकता असेल तेव्हा मदतीला येईल, अशी स्ट्रॉंग सपोर्ट सिस्टीम नाही. त्यामुळे त्यांचे भरणपोषण नीट होत नाही. सटरफटर शंभर कामे त्यांच्यामागे लावून दिलेली. सरकारी शाळांत तर माहितीचा महापूर बारा महिने सुरू असतो. वर्गातले काम नाही झाले तरी चालेल. माहिती वेळेत सादर करावी लागते. त्यामुळेच आज सरकारी शाळेतल्या शिक्षकांची स्थिती भूमिकावादाच्या चक्रव्यूहात गुरफटलेल्या अभिमन्यूसारखी झालीये असे असले तरी या सगळ्या प्रकारच्या प्रतिकूलतेवर मात करून अनेक उत्साही आणि प्रयोगशाली शिक्षक वेगळे काही करू पाहताहेत. त्यांनी समृद्धीची बेटं फुलवलीत. वाळवंटातल्या झाडांचा मूळं पाणी शोधतात, तसेच शिक्षक नव्या वाटा शोधताहेत.. शिक्षणातले नवे तत्त्व समजून घेताहेत. फारुक काझी हा तरुण शिक्षक अशाच धडपड्या शिक्षकांपैकी एक! कामाशी इमान राखून सतत पुढे चालणारा.

भारतातील शिक्षकांनी आपले अनुभव लोकांसमोर खुले करून सांगितल्याची उदाहरणे दिसत नसल्याची खंत वाटत राहते. त्यामुळे आपण एका मोठ्या शैक्षणिक इतिहासाला मुकलोय. या पार्श्वभूमीवर सरकारी शाळेत शिकविणाऱ्या फारुक काझीसारख्या अत्यंत संवेदनशील मनाच्या सर्जनशील शिक्षक मित्राचे दहा वर्षांपूर्वीच्या शाळेतल्या कडू-गोड अनुभवांवर आधारित लिहिलेले ‘शिकण्याच्या वाटेवरचं’ आनंदवन हे पुस्तक अत्यंत आश्वासक वाटते.

डी.एड. झालेला एक तरुण नोकरीची स्वप्न पाहतानाच ग्रामीण भागातल्या जिल्हा

परिषदेच्या सरकारी शाळेत शिक्षक म्हणून रुजू होतो. सुरुवातीलाच शिक्षणाचे कोणतेही 'संस्कार' नसलेला वर्ग वाट्याला येणे, त्याही स्थितीत उमेदीने नवे काही करायला घ्यावे तर सहकारी शिक्षकांकडून पदोपती होणारा अपमान, पर्यवेक्षयीय यंत्रणेतील अधिकाऱ्यांकडून वाट्याला येणारी अवहेलना, त्यांचे 'पारंपारिक' वागणे या सगळ्यांतून उत्साह करपून जातो. ऊर्जा पाझरून जाऊ लागते. काहीच कसे मनाजोगते होत नाही? हा प्रश्न सतत शिक्षकाला छळत राहतो. सर्वार्थाने अभावग्रस्त अशा वातावरणात येऊन पडल्यामुळे नोकरी मिळाल्याचा आनंद कुठल्याकुठे विरुन गेलेला असतो. खचून जाण्यापेक्षा पर्यायांच्या वाटेने हा शिक्षक चालू लागतो. निराशेतून आलेली मरगळ बाजूला सारून अपमान गिळून ध्येयाने झपाटलेला आणि शिक्षणाविषयी आस्था असणारा एक शिक्षक दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर अनेक अडचणी समस्यांवर शरण न जाता त्यावर मात करून स्वत: स्वत:ची वाट शोधतो. मुलांमध्ये शिकण्याची नवे काही आस आणि आनंदाचा नितळ, निर्मल पाण्याचा झरा सतत खळाळत ठेवतो. साधनांचा, सुविधांचा अपुरेपणा असला तरी निव्वळ अभिनव कल्पना आणि मुलांच्या भावविश्वाला आकार देणारे नवनवे उपक्रम, कल्पक, प्रयोग यातून मुलांचे शिकणे कशाप्रकारे आनंददायी बनवतो... सुरुवातीला विरोध करणारे, हेटाळणी करणारे सहकारी आणि शिक्षणप्रेमी पालकही हळूहळू सोबत येऊ लागतात... एक शाळा छानपैकी आकार घेऊ लागते.. या दरम्यान अनुभवलेले चढ-उतार.... हे सारे कसे घडत जाते? याचा प्रवास अधोरेखित करणारी ही एक प्रेरक कहाणी म्हणजे हे 'शिकण्याच्या वाटेवरचं 'आनंदवन!' या सर्वच बाबींवर शिक्षणतज्ज्ञ लीलाताईंची प्रेरणा व प्रभाव स्पष्टपणे जाणवतो..

आज सरकारी शाळा आणि तिथले शिक्षक यांच्या विषयी समाजात उलटसुलट चर्चा सतत सुरू असते. जे जे सरकारी ते ते तद्दन फालतू, दर्जाहीन आणि जे खाजगी ते गुणवान असा समज आपल्या समाजाने करून घेतलाय सरकारी शाळांची विश्वासार्हता घालवणं सुरु झालय, हे येथे मुद्दाम लक्षात घ्यायला हवं. समाज, शिक्षक संघटना, शिक्षकांनी आणि ग्रामीण भागातल्या पालकांनीही याकडे अधिक डोळसपणे पाहण्याची गरज आहे. खाजगी शाळांतील शिक्षकांना कारकुनाची, आचाऱ्याची, गवंड्याची, शिपायाची, शिंप्याची अशी

कोणतीही कामं नसतात! याची जाणीव करून द्यावीशी वाटते. ग्रामीण भागांतील इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा फुगा आता फुटू लागलाय या इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा दर्जा व गुणवत्ता याबाबत मोठ्ठं प्रश्नचिन्ह उभं ठाकलंय!

शिक्षण क्षेत्रात नव्या वाटा निर्माण होत असतात. उपक्रम सुरू असतात. पण हे काम समाजापर्यंत पोचत नाही. त्यामुळे अपुऱ्या माहितीच्या किंवा समजूतीच्या आधारे जी काही टीका होते तेच वास्तव मानले जाते. समाज आपले मत बनवून मोकळा होतो.

वाडी वस्तीवर प्रामाणिकपणे, मन लावून, झोकून देऊन काम करणारे शिक्षक माध्यमांना माहितच नसतात! त्यांचे काम उजेडात यावे, लोकांपर्यंत पोचावे यासाठी त्यांनी 'लिहिते व्हावे' असे मनापासून वाटते. फारुकने या पुस्तकाच्या निमित्ताने इतर शिक्षकांसमोर लिहिते होण्याचा चांगला वस्तूपाठ घालून दिलाय.

वेगळं काही करून दाखवण्यासाठी आसुसलेले, झटणारे, प्रामाणिक, धडपड करणारे शिक्षक खूप मोठ्या संख्येने आहेत. हे चित्र खूपच आशादायी आहे. व्यवस्थेवरचा विश्वास वाढवणारे आहे. आणि हेच लोक खरेखुरे नवनिर्माणाचे शिलेदार आहेत. त्यांच्यामुळे शिक्षणाचा डोलारा शाबूत उभा आहे. अन्यथा तो कधीच कोसळला असता.

फारुक काझी या प्रवासात मला भेटलेला असाच एक शिलेदार आहे. तो एकटा नाही. अंकुरलेल्या गटाचा तो नायक आहे. सतत नवं काही करु पाहणारा. स्वत:ला अपडेट ठेवण्यासाठी धडपडणारा, वाचन, चिंतन, मनन, लेखन करणारा. माहिती, ज्ञान मिळविण्यासाठी तहानलेला, भुकेलेला माणूस म्हणून, शिक्षक म्हणून स्वत:भोवतीच्या चांगुलपणाच्या वर्तुळाचा परीघ दिवसेंदिवस रुंदावत नेणारा. विधायक स्वप्नं पाहणारा ती वास्तवात आणण्यासाठी तन-मन-धनाने काम करणारा. मुख्य म्हणजे शिक्षक केवळ एक कर्मचारी नाही. शिक्षणक्षेत्रात काम करणारा तो 'पेड सोशल वर्कर' असला पाहिजे. फारुकच्या कामाकडे बघितले की, याची मनोमन साक्ष पटते. समर्पित भावनेनं सुरू असलेल्या त्याच्या अंगीकृत कामाला मनापासून सलाम आणि सदिच्छाही!

**- भाऊसाहेब चासकर**
अकोले, अहमदनगर

# संवाद ...

हे शिकण्याच्या वाटेवरचं आनंदवन तुमच्या हाती देताना होणारा आनंद मी शब्दांतच मांडू शकत नाही. ८-१० वर्षे जे लिहून तयार होतं; परंतु समोर कधीच आलं नव्हतं. आज तुमच्या हाती देतोय.

शिक्षक म्हणून एक तरुण मुलगा काय स्वप्नं सजवतो... धडपडायचंय, नवीन काहीतरी करायचंय, नवनव्या स्वप्नांना आकार द्यायचाय, स्वत:च्या अनुभवांना पैलू पाडायचेत या आणि अशा कितीतरी स्वप्नांना आकार देत झगडत, पडत, उठत... शिक्षक कसा पुढे सरकतो... हे मांडणं मला थोडं महत्त्वाचं वाटलं.

जे कुणी लिहित नाही ते मी लिहिण्याचा प्रयत्न केलाय. काही अनुभव खूप साधे... छोटे... बाळबोध वाटतील... पण खरं सांगू, आयुष्यातले असे छोटे छोटे प्रसंगच तुम्हाला मोठं व्हायला मदत करतात. अनुभव मी माझ्या वर्गात करून पाहिलेल्या प्रयोगांचे आहेत. ते साधे असतील पण त्यामागील हेतू मात्र साधे नाहीत हे आपण समजून घ्याल अशी अपेक्षा करतो...

हे शिकण्याच्या वाटेवरच आनंदवन वाचत असताना प्रत्येकजण स्वत:ला शोधत राहील. त्याला वाटेल अरे यार मी हे करून पाहिलंय... this is me... तिथच या लेखनाचं सार्थक होईल. शिक्षक नवीन स्वप्नं घेऊन काम करायला सुरुवात करतो. उतरंड वाईट असली तरी स्वत:ची स्वप्नं गाडू द्यायची नाहीत... आपण थांबायचं नाही... ही अंत:प्रेरणा त्याला सतत जिवंत ठेवत असते.

फारूक काझीचा प्रवास सुरू झाला तेव्हा सोबत होती ती फक्त लीलाताईंच्या पुस्तकांची! त्यांनीच मला माझ्यातल्या शिक्षकमाणसाची ओळख करून दिली. बे एके बेच्या पठडीत न अडकता मला काहीतरी वेगळं करायचंय ह्या विचाराने झपाटल्यासारखा कामाला लागलो. आपण मुलांना शिकवतो हा गैरसमज दूर सारून उलट तेच आपल्याला शिकवतात ही

शिदोरी सोबत घेऊन चालू लागलो. आजही ती सोबत आहे. वरचेवर वाढच होते आहे.

काम करत असताना अनेक मोडून पडण्याचे प्रसंग आले. पण त्यावेळी माझे मित्र माझ्या सोबत आले. राजीव तांबे, लीलाताई पाटील, मॅक्सीनमावशी, मंजिरीताई निमकर, किशोर दरक, परेश जयश्री मनोहर, भाऊ चासकर, डॉ. संजीवनी केळकर, गीता महाशब्दे, सुचेता पडळकर, जगन्नाथ गोडसे, एकनाथ गुरव व झाडबुके गुरूजी या आणि अशा कितीतरी मित्रांनी हा प्रवास सुंदर बनवला. सतत पटवून देत आले की तू हरू शकत नाहीस, कारण तो तुझा गुण नाही. कुटुंबातील व्यक्तींनी तर फारुकला हे सर्व करायला पूर्ण स्वातंत्र्य व सहकार्य केलं. माझा वेडेपणा खपवून घेतलाच उलट तू जे करतोयस त्यात तुझा आनंद आहे तर तू बिनधास्त ही धडपड करत रहा हा विश्वास दिला. माझं कुटुंब, आप्त ही माझी प्रेरणा आहेत.त्यांच्यामुळे माझी स्वप्नं जिवंत आहेत.

एकनाथ गुरव या मित्राच्या मनात आलं नसतं तर हे पुस्तक झालंच नसतं. त्यांच्या ऋणातच राहणं मला जास्त आवडेल. आनंदवन सुरवातीला ज्या मासिकातून क्रमशः प्रकाशित झालं ते 'शिक्षणवेध' (अकलूज) मासिक व त्याचे संपादक आदरणीय श्री. सा. सु. देशमुख सर यांचे मानावेत तेवढे आभार थोडे आहेत. या पुस्तकाचं सुंदर मुखपृष्ठ व आतील रेखाटनं यांनी हे पुस्तक सजवलं ते माझे मित्र श्री. सीताराम पाटील व हे पुस्तक ज्यांच्या हातून तयार होतंय ते भारती मुद्रणालय व शिपूरकर परिवार... सर्वांचे आभार मानल्याशिवाय मी पुढं जाऊ शकत नाही.

शिकण्याच्या वाटेवरची अशी आनंदवनं प्रत्येक शाळेवर बहरावीत हेच स्वप्न इथं आहे. सकारात्मक विचारांचं वर्तुळ रुंदावत जावं व याची रेंज वाढतच जावी हाच यामागील प्रामाणिक हेतू... सरकारी शाळा व त्याबाबतीत समाजाची एकंदरीत धारणा याबाबत भाऊने तुमच्याशी साधलेलं हितगुज खूप महत्त्वाचं आहे. तो स्वतः एक नवनिर्माणाच्या शिलेदारांची फौज उभी करणारा सेनापती- शिक्षक आहे. सरकारी शाळांवर आलेलं संकट टाळून टळेल याची शाश्वती नाही. सकारात्मक विचारांची साथ सुटू नये... एकत्र येऊन काही सकारात्मक प्रयत्न करता येतील. ATF (Active Teacher's Forum) असो की Ankur Group असो...

प्रयत्न अशा सकारात्मकतेतूनच जन्माला आलेत. एकच ध्येय एकत्र येवून काही सकारात्मक करू. सकारात्मक दबावगट निर्माण करून महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील उपक्रमशील धडपड्या शिक्षकांना सोबत घेऊ, शिक्षणात काही आशादायक बदल घडवू.

हे शिकण्याच्या वाटेवरचं आनंदवन त्याचंच एक रूप. हे भावेल याची खात्री वाटतेय. हे धाडस आपल्यातल्या सकारात्मकतेला हाक देण्यासाठी करतोय. आपण प्रतिसाद द्याल असाही ठाम विश्वास मला आहे. पुस्तक वाचून झाल्यावर कसे वाटले हे कळवावे हे सांगणे नको....

शिकण्याच्या वाटेवरचा तुमचाच एक साथी.

**- फारुक एस. काझी**

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | वाट नवीन आहे जरा जपून... | १३ |
| २. | तू राग आवरायला हवा... | २१ |
| ३. | धीरा पोटी... | २९ |
| ४. | ऋतू बदलत आहेत... | ३७ |
| ५. | एवढ्याने खचून कसं चालेल... | ४७ |
| ६. | हसत खेळत शिक्षण... | ५७ |
| ७. | त्यांचा आवाज गोड आहे... | ६५ |
| ८. | परीक्षा पास होताना... | ७३ |
| ९. | रंग रंगीला रंगमंच... | ७९ |
| १०. | खेळ खेळ खेळाचा... | ८७ |
| ११. | वर्ष संपताना... | ९५ |
| १२. | शिदोरी | १०५ |

"शिक्षा को सुंदर बनाने का रास्ता यही है कि बच्चे के साथ चलो!"

- प्रा. कृष्ण कुमार

प्रकरण १

# वाट नवीन आहे जरा जपून...

छात्रशिक्षक म्हणून शिक्षण घेताना शिक्षकी पेशाविषयी खूप आदर्शवादी कल्पनांची मनोराज्यं आम्ही उभी केली होती. शिक्षकी पेशाविषयी असणाऱ्या ओढीमुळे असेल कदाचित; परंतु आपण असं करायचं - तसं करायचं, खूप-खूप शैक्षणिक साधने तयार करायची, मन लावून शिकवायचं, नवीन पिढी घडवायची, हीच ती स्वप्नं! आता नवीन पिढी घडवायची म्हणजे नेमकं काय करायचं? या प्रश्नाच्या वाट्याला मी कधी गेलो नाही; पण मला तसं वाटायचं हे खरं!

मुलांना न रागावता प्रेमाने त्यांना समजवावं, हेच माझं पूर्वीपासून मत होतं. प्रशिक्षणार्थी असताना पाठादरम्यान त्याचा प्रत्ययही यायचा. मुलं शांत राहून उत्तरं देऊन सहभागी व्हायची. शिक्षक म्हणजे 'आनंदाची डहाळी' वाटायचा. मुलांनी हक्काने, मनसोक्त त्या डहाळीशी खेळावं, बागडावं. शिक्षक म्हणजे प्रेमाचा आदर्श नमुना वाटायचा, प्रत्येकाच्या मनात हीच भूमिका असते. त्यातूनच या पेशाविषयी अधिकच अभिमान वाटायला लागला. कधी एकदा नोकरीला लागतोय आणि अध्यापनाचं काम सुरू करतोय, असं व्हायला लागलं.

एकदाचा दोन वर्षांचा छात्रशिक्षक म्हणून पार पाडायचा काळ पार पाडला. आता प्रतिक्षा होती ती शिक्षकी पेशात प्रवेश करण्याची. हा पेशा म्हणजे सेवा आहे वगैरे पूर्वी कुठेतरी वाचलं होतं. राजा मंगळवेढेकरांचं 'शिक्षक मित्रांनो' व प्राचार्य लीलाताई पाटील यांची एक-दोन पुस्तकं वाचली होती. त्यामुळे मी स्वत:कडून अधिक अपेक्षांची अपेक्षा करत होतो.

नोकरी मिळाली. पाचवीपर्यंतची मोठी शाळा. शाळेचा पहिला दिवस म्हणून डोळ्यांत मोठी स्वप्नं व काहीतरी भव्यदिव्य करण्याचा ठाम विश्वास घेऊनच मी शाळेवर पोहोचलो. मुख्य रस्त्यापासून दूर आतमध्ये शाळा. संपूर्ण कच्चा रस्ता. ते अंतर पाहूनच डोळ्यांतील निम्मीअर्धी स्वप्नं तिथंच खलास झाली. कसंबसं दमून भागून मी शाळेवर आलो. तिथलं

एकंदरीत वातावरण पाहून उरलेला उत्साहही पार मावळून गेला.

शाळेच्या कुंपणाची अवस्था वादळात जमीनदोस्त झालेल्या आणि कुठे कुठे तग धरून उभ्या असलेल्या झाडांसारखी झाली होती. जुन्या वाड्यासारखी शाळेची इमारत वाकून उभी होती.

मुख्याध्यापकांशी परिचय करून घेतला. त्यांनी सर्व सहशिक्षकांशी ओळख करून दिली. मुलांच्यासमोरही हा ओळखीपाळखीचा कार्यक्रम उरकला. 'नवीन सर' हे नवीनच नाव मला चिकटलं. मुलं अगदी नव्या डोळ्यांनी मला पाहत होती.

प्रार्थना, ओळख आटोपून आम्ही सर्वजण ऑफिसमध्ये आलो. मुख्याध्यापकांनी सर्वांसाठी चहा मागवला. इकडचे तिकडचे बोलणे झाल्यावर मी विषय काढला.

"सर, माझ्याकडे कोणता वर्ग असेल?"

धीर करून मी प्रश्न विचारला.

माझ्या प्रश्नावर एक-दोघांनी असं पाहिलं, जणू त्या सर्वांदेखत मी प्रश्न विचारून मूर्खपणा केला आहे. मला खूप संकोचल्यासारखं वाटायला लागलं. स्वत:चा राग आला. मुख्याध्यापक हसले -

"सर तुमच्याकडे चौथीचा वर्ग सोपवायचं ठरलंय. इतर शिक्षकही तुम्हाला मदत करतील. आपण थोड्याच वेळात चौथीच्या वर्गावर जाऊ. तोवर इतरांशी चांगली ओळख तर करून घ्या."

मी थोडा वेळ बसलो; मात्र मनातून खूपच अस्वस्थ झालो होतो. मुख्याध्यापकांसोबत वर्गाची वाट चालू लागलो.

वर्गाजवळ येताच मनाची घालमेल होऊ लागली. क्षणभर मनावर दडपण आलं. थोडीशी भीती वाटली. आम्ही वर्गाजवळ येताच कानावर गोंधळ ऐकू येऊ लागला. कुणीतरी जोरजोरात शिव्या देत होते. भांडत होतं.

आम्ही वर्गात पाऊल टाकताच सगळी मुलं आपापल्या जागेवर जाऊन बसली. नवख्या माणसाने आधीचा गोंधळ व आत्ताचा हा शांत वर्ग पाहिला असता, तर त्याचाही विश्वास बसला

नसता की, हाच वर्ग गोंधळ घालत होता म्हणून.

मुख्याध्यापकांनी मुलांना माझी ओळख करून दिली. सगळी मुलं शांत बसून माझ्याकडे टक लावून पाहत होती. काही आतुरतेने पाहत होती. काहींच्या चेहऱ्यावर "ही नवी कटकट कशाला?" असा भाव होता, तर काहींच्या डोळ्यांत 'आपले सर' असाही भाव होता. मागील दोन वर्षांपासून या वर्गाला शिक्षक नव्हता.

"वर्ग थोडासा खोडकरच आहे. सांभाळून घ्या. आम्ही आहोतच मदतीला," मुख्याध्यापक एवढं बोलून निघून गेले. ते जाताच मुलांचा गोंधळ बटन दाबून एखादं यंत्र सुरू करावं तसा सुरू झाला. त्या गोंधळाने मीच गोंधळलो. जे काही घ्यायचं ठरवलं होतं तेच विसरून गेलो; परंतु सुरुवात तर करावीच लागणार नाही.

"हंऽऽ इकडं पाहा मुलांनो."

पण माझे शब्द मलाच नीटसे ऐकू आले नाहीत. मग विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोचणार? दोन-चार वेळा मुलांना शांत बसवण्याचा प्रयत्न केला; मात्र तोही निकामी ठरला. मला राग येऊ लागला होता. मी रागानेच टेबलावर जोरात पट्टी आपटून "शांत बसा गाढवांनोऽऽ..." असं मोठ्याने म्हणालो.

मुलं एकदम शांत! ही मात्रा बरोबर लागू पडली; पण मुलांना आपण गाढवांनो म्हणालो, ही रुखरूख मनाला लागलीच. असं पुन्हा म्हणायचं नाही, असं ठरवून मी मुलांची ओळख करून घ्यायला लागलो.

ओळख करून दिल्यावर चार-दोघांनी करंगळ्या दाखवून "जाऊ का?" असं विचारलं. मी त्यांना सोडलं; पण शाळा सुटली तरी ती मुलं परत आली नाहीत. कारण काय विचारलं, तर कळालं - "ते नेहमीच असं करतात."

गप्प बसण्याशिवाय माझ्याजवळ दुसरा पर्याय नव्हता. आपणाला वर्षभर अशा समस्यांना तोंड द्यावंच लागणार आहे, हे मी मनोमन जाणलं होतं. माझ्या वर्गात एकही शैक्षणिक साहित्य नव्हतं. खिडक्यांना केवळ चौकटीच होत्या. गज-दरवाज्यांचा ठावठिकाणाच नव्हता.

आपण जर शैक्षणिक साहित्याची योजना केली, तर या खिडकीतून घुसून त्यांची नासधूस कुणीही करू शकलं असतं. सगळा उघडाच मामला!

त्यातच वर्गाला लागलेली 'बेशिस्ती'ची सवय! कानाचे पडदे फाटतात की, काय एवढा गोंधळ मुलं करत होती. माझ्यासमोर एकच समस्या नव्हती, उलट समस्यांचं जाळंच होतं. मुलं शांत होत नाहीत तोवर मी शिकवू शकत नाही आणि अशा बकाल वर्गात बसून मुलांनी शिक्षण घ्यावं तरी कसं? भिंतींना ना रंग ना सजावट, वाळवंटात बाग फुलवायची होती जणू.

आजवर कल्पिलेल्या आदर्शवादी विचारांची वाफ झाली होती. आपण आजवर ज्या मनोराज्यात वावरत होतो, तेवढं वास्तव सहजसोपं नाही, याची जाणीव होऊ लागली होती. वर्गात बसून शेती कशी करावी, हे शिकण्यात आणि प्रत्यक्ष शेतात कष्टण्यात जेवढं महत् अंतर आहे. तितकंच अंतर माझ्या स्वप्नांत आणि वास्तवात होतं. प्रशिक्षण काळात केवळ पुस्तकं, पाठ टाचणं यांनाच जास्त महत्त्व दिलं जातं; परंतु प्रत्यक्ष शाळेवर गेल्यावर कोणकोणत्या समस्या भेडसावतात, त्यावर उपाय काय? याविषयी फारसं मार्गदर्शन होत नाही. हा त्या त्या शिक्षकाच्या कौशल्याचा भाग असतो, असं एकच उत्तर नेहमी दिलं जातं. वर्गव्यवस्थापन, उपक्रमशीलता याविषयी फारसं काही शिकायला, पाहायला, करायला मिळत नाही. त्यामुळे नव्याने रुजू होणाऱ्या शिक्षकाची अवस्था काहीही न येणाऱ्या मुलाला कुणीतरी नुसते प्रश्न विचारून भंडावून सोडावं अगदी तशीच होते. माझीही अवस्था त्याहून वेगळी नव्हती.

नव्याने काही उभारायचं नव्हतं; पण आहे त्यात डोंगराएवढ्या सुधारणा करायच्या होत्या.

पहिला दिवस कसाबसा सरला; मात्र हे सर्व नित्याचंच झालं होतं. मुलांच्या गोंधळामुळे व्हायचा तो परिणाम झालाच. माझा स्वभाव जास्त चिडखोर झाला. मुलांना शिक्षा करणं, हा रोजचाच भाग होऊन गेला. मुलांशी प्रेमाने वागायला हवं, हे मलाही पटत होतं; मात्र रागावणं, शिक्षा करणं याशिवाय दुसरा मार्गच सापडत नव्हता. मुलांना धाकात ठेवण्यासाठी

सुरुवातीला असं करावंच लागतं, हा प्रत्येक शिक्षकाचा अनुभवी सल्ला! मीही त्यातूनच जात होतो. नवीन काही करण्याच्या धुंदीत धोपट मार्गानेच माझा प्रवास चालला होता.

खूप विचार करूनही मला मार्ग सापडत नव्हता. त्याचा परिणाम म्हणून वर्गातली शांतताच नाहीशी झाली. वर्ग म्हणजे जणू रणांगणच! मुलांची कलकल थांबतेय न थांबतेय तोवर माझा आवाज वाढत होता. मुलं क्षणभर शांत बसत होती आणि थोड्याच वेळात गोंधळाचं मोहळ उठत होतं.

वर्गात शिकवण्याकडे मुलांचं लक्ष नसायचं. भांडणं, शिव्याशाप यांना उधाण यायचं. माझे सगळेच प्रयोग निष्फळ ठरू लागले. माझा स्वभाव जास्तच चिडखोर झाला.

सहशिक्षकातही माझा वर्ग चर्चेचा विषय झाला. 'कशी मजा होतेय एकाची', असाही काहींचा रोख असायचा. मी पराभूत होत होतो. उमेदीच्या काळात असं खचणं आपल्याला शोभत नाही, असं मनोमनी वाटायचं; पण पुन्हा वास्तवाचं ऊन पोळायला लागायचं.

याविषयी मी मुख्याध्यापकांशी बोलायचं ठरवलं. त्यांनी माझी सगळी बडबड ऐकून घेतली; आपलं ठेवणीतलं स्मितहास्य करत म्हणाले -

"सर, तुम्ही नवीन आहात. म्हणूनच तुम्हाला थोडी अडचण येतेय. मुलंच ती, गोंधळ हा करणारच! पण आपणही त्यांच्यासारखा गोंधळ करायला लागलो, तर वर्गात शांतता येणारच कशी? त्यामुळे वर्गातली शांतताच नाहीशी होते.

तुमची धडपड - कळकळ मी समजू शकतो; मात्र केवळ धडपड किंवा कळकळ असून चालत नाही. पुढची वाट कशी आहे, हे आपण सांगू शकत नाही; मात्र पायाखालची वाट कशी आहे, हे आपण जाणू शकतो. त्यानुसारच आपल्याला तयारी करावी लागेल. खड्डा टाळावा लागेल. दगड बाजूला सारावे लागतील, कष्ट तर पडतीलच! म्हणून स्वत:च्या स्वप्नांचा विसर पडू देऊ नका आणि रागावून स्वत:ला मनःस्ताप करून घेऊ नका. हे काम कठीण आहे. वेळ लागेल; पण यशाची खरी चव तिथंच आहे जिथं कष्टाची कमतरता नाही."

अंधाऱ्या खोलीत एखादा दिवा तेवावा आणि त्याने अंधाराचा ठाव घ्यावा, असाच

क्षणभर भास झाला. डोळ्यांसमोरील काळे ढग हटू लागले. समोर वाट, अंधुकशी का होईना दिसत होती. डोक्यात मात्र एकच विचार गरगरत होता -

"वाट नवीन आहे, जरा जपूनच पाय टाकायला हवा. जिथं श्रमाची कमतरता नाही, तिथंच यशाची खरी चव आहे."

◆



## काहीच हरकत नाही...

काहीतरी नवीन करून बघायला काहीच हरकत नाही.
आणि चुका करायलासुद्धा घाबरायचं कारण नाही.
चुकांमधून तर खूप शिकत जातो आपण.
धोके पत्करायला काहीच हरकत नाही.
आणि घाई करायचं काही कारण नाही.
आपली स्वत:ची गती शोधून काढावी...

आणि आपल्याला मनापासून वाटतं तसंच करावं...
नापास झालं तर काहीसुद्धा बिघडत नाही..
न घाबरता पुन्हा प्रयत्न करता येतोच...

कुणाला आपण मूर्ख वाटलो, तरी हरकत नाही.
इतरांपेक्षा वेगळे असलो, तरी काहीच बिघडत नाही.
आपल्या मनाची तयारी होईपर्यंत थांबलं तरी चालतं.
नवे प्रयोग केले तर छानच असतं. काळजी मात्र घ्यायची!
हे असंच का? असं विचारावंच...

'आपण आहोत' तसं असणं 'खासंच' असतं...
पसारा तर करणं आवश्यक असतं
तो आपण नंतर आवरून टाकला की झालं.
नवीन काही निर्माण करायचं तर
थोडा पसारा, थोडा कचरा, थोडा चिकचिकाट होणारच !

कवी - **ॲन सायर वाइजमन**
अनुवाद - **शोभा भागवत**
('पालकनीती'तून साभार)

प्रकरण २

# तू राग आवरायला हवा...

मुख्याध्यापकांचा सल्ला मानला. मनात पुन्हा एकदा काहीतरी भव्यदिव्य करण्याची इच्छा जन्म घ्यायला लागली. आपण हे घ्यावं, ते करावं, या कल्पनाविलासात मी वर्गाची सद्यस्थिती पूर्णत: विसरूनच चाललो होतो.

ज्या मुलांना अ आ इ ई चा गंधही नव्हता, तसेच क काच्या बाराखडीची तोंडओळखही नव्हती त्या मुलांकडून मी वाचनाची व लेखनाची अपेक्षा करत होतो; परंतु हे सर्व करताना पुन:पुन्हा निराशाच पदरी पडत होती.

मुलांना काहीतरी करायला सांगावं आणि त्यांनी मठ्ठपणे माझ्या तोंडाकडे पाहावं हे नित्याचंच झालं होतं. माझा पारा चढत होता. मग इथून-तिथून सगळा वर्ग शिक्षेस पात्र ठरत होता.

मनाची समजूत घालूनही काही परिणाम झाला नाही. आपलं ज्ञान इथं कुजू लागलंय, काय म्हणून या क्षेत्रात आलो? असंही वाटायला लागलं. नकारात्मक विचारांचे काळे ढग जमून यायचे आणि उरला-सुरला प्रकाशही गायब व्हायचा. पुन्हा काळामिट्ट अंधार वाट्याला यायचा.

एकदा वर्गात गणिताचा तास सुरू होता. संख्या सांगून झाल्या. कोणती गणिती क्रिया करायची, हेही सांगून झाले; परंतु काही मोजकी मुलं सोडली, तर बाकी कुणीच पाट्या दाखवल्या नाहीत. काहींना तर संख्याच लिहिता आल्या नव्हत्या.

चीड-चीड झाली नुसती. मस्तकाची नस तटतटून फुगली, तळपायाची आग मस्तकाला गेली.

"दगड आहात नुसते दगड! भूतासारखे नुसते पाहत काय राहिलात मुर्खांनो!"

तोंडाचा आणि छडीचा पट्टा चालूच होता. मुलं केविलवाणा चेहरा करून पाहत होती.

काही जण रडत होती. माझ्याच्याने ते पाहवेना. मुलांना रडताना पाहून वाईट वाटलं. आपण उगीचच यांना शिक्षा केली. चुकलंच आपलं! असा प्रसंग घडायचा आणि पुन्हा पहिले पाढे पंचावन्न व्हायचे. पुन्हा चीड यायची व मुले मुकाट मार खायची.

याचा परिणाम असा झाला की, मुलं जवळ येईनाशी झाली. वर्ग जणू मुका-मुकाच झाला.

मित्राशी चर्चा करताना मी सर्व प्रसंग कथन केले. "मुलांवर मीही खूप प्रेम करतो रे! त्यांना मारावंसं ही वाटत नाही; पण नाईलाज होतो. कळत नाही काय उपाय करावा?" मित्र हसला.

"एक सांगू का? बघ पटतंय का?"

"सांग तरी, काय सांगणारायस ते!"

"तू आधी आपला राग आवरायला शिक. राग आवरल्याशिवाय तुला मार्ग सापडणार नाही."

"काय? राग आवरू?"

"हो! तुझ्या मुख्याध्यापकांनीही तुला हाच सल्ला दिला होता ना? तुला उपाय शोधायचा असेल, तर आधी राग आवर. 'अति कोपता कार्य जाते लयाला' असे म्हटले जाते. शांत डोक्यातच चांगले विचार येतात. योग्य मार्ग सापडतात."

"पण हे करू कसं?"

"तुला एक गोष्ट सांगतो. न्यूटनची. एकदा न्यूटन प्रयोगशाळेत काहीतरी प्रयोग करत होता. त्याचा लाडका कुत्राही तिथंच बसून होता. रात्रभर प्रयोग केल्यावर पहाटे न्यूटनला अपेक्षित परिणाम मिळाले. त्याने सर्व टीपा कागदावर उतरवून घेतल्या. कुत्रा तोवर पुरता कंटाळला होता. न्यूटनने बाहेर जाऊन पाय मोकळे करून यावे म्हणून दरवाजा उघडला. त्याच्या कुत्र्यालाही आनंद झाला. आनंदाच्या भरात तो टेबलाजवळ धडपडला आणि टेबलाजवळचा दिवा उपडा झाला. रात्रभर जागून केलेल्या प्रयोगांच्या टिपणांचे कागद जळून खाक झाले.

न्यूटन जेव्हा परत आला तेव्हा त्यालाही खूप राग आला; पण रागावणेही व्यर्थ होते. त्याने राग व्यक्त केला नाही. उलट कुत्र्याला प्रेमाने जवळ घेऊन सांगितले, "तुझ्या धडपडीने मला भलताच त्रास दिलाय. असू दे आपण अजून एक रात्र जागून हाच प्रयोग पुन्हा करू."

मित्र थांबला. मीही स्तब्ध होतो. विचार करत होतो.

"न्यूटनचं तर किती मोठं नुकसान झालं; पण तो रागावला नाही. त्यामुळे तोच प्रयोग पुन्हा करण्याची त्याला प्रेरणा मिळाली. कदाचित याच गोष्टीत तुला हवा तो उपाय असेल."

माझे डोळे उघडले. केवळ रागावर विजय मिळवूनच मी माझा मन:स्ताप कमी करू शकणार होतो. मुलांच्या स्वत:च्या अनेक चुकांतूनच नवीन प्रेरणा घेऊन प्रयत्न करणार होतो. या गोष्टीचा माझ्या मनावर खूप खोलवर परिणाम झाल्याचं जाणवलं.

न्यूटनच्या गोष्टीच्या प्रसंगानंतरचाच प्रसंग. थॉमस एडिसनची एक कथा वाचनात आली. त्या कथेजवळ मी थबकलोच. त्या कथेने मनात नव्याने उमेदीचे बीज रुजवले. ती कथा अशी -

थॉमस एडिसन ६७ वर्षांचा असताना, त्याच्या कारखान्याला आग लागली. त्याने सगळे शोध लावलेली कागदपत्रे, यंत्रसामग्री आगीच्या भक्ष्यस्थानी पडली; परंतु न खचता एडिसन म्हणाला -

"आपल्या सर्व चुका आता आगीत भस्म झाल्या, आता आपल्याला नव्याने नवीन शोध लावता येतील."

त्या प्रसंगानंतर आठवड्यातच त्याने फोनोग्रामचा शोध लावला. त्यानेही स्वत:शी म्हटलेच असेल -

"माझी मान ताठ आहे, बुद्धी काम करतेय. मला यश नक्कीच मिळेल."

आयुष्याची कित्येक वर्षे खपून लावलेल्या शोधांचे कागद क्षणात जळून नष्ट झाले; पण एडिसनच्या चेहऱ्यावर राग, नैराश्याची साधी खूण, तर सोडाच पण साधी चीड व नाराजीही दिसली नाही. उलट स्वत:च्या सगळ्या चुका जळाल्या, आता नवीन काही करता येईल, ही विधायक मानसिकता! मी कोड्यात पडलो होतो.

आजवर आपण केवळ निराशावादाच्या झंझावातात भिरभिरत होतो; पण आता नव्याने कामाला लागायला हवे. राग आवरायला हवा. आपल्याही साऱ्या चुका जाळून नव्याने उभारायला हवं. पहिल्यांदा जमीन तयार करूनच पेरणीची तयारी करायला हवी. पिकाचं स्वप्न तूर्त तरी दूर ठेवायला हवं.

माझं वर्गात येणंच मुलांना संकट वाटू लागलं होतं. जणू वर्गातील उपस्थितीही खालावली होती; पण आज मी बदललो होतो. ज्या अपेक्षेने ही मुलं आपल्याकडे पाहतात ते प्रेम आपण त्यांना द्यायलाच हवं, हे मी ठरवलं होतं. 'मारकुटे मास्तर प्रेमळ कसे होतात' हे सिद्ध करायचं होतं.

"मुलांनो आज आपण अ आ इ ई चा आणि बाराखडीचा खेळ खेळू या" वर्गात काही बाराखडी येणारी मुलं निघाली.

"अरे वा! आपल्या वर्गातील काही मुलांना पूर्ण बाराखडी येते, हे मला माहीतच नव्हतं" मी आश्चर्यानं विचारलं.

"सर, तुम्ही कधी विचारलंच नाही." एकाने धाडसाने उत्तर दिलं. माझी चूक मला उमजत होती. आपली चूक झाली खरी; पण आता ती सुधारायला हवी.

"ठीकाय, आपण चार-चार जणांचे गट करू. मी काही शब्द देणार. त्यातून तुम्ही मुळाक्षरं शोधायची आणि म्हणत म्हणत लिहायची. आजपासून आपण हाच खेळ खेळायचा. खूप मज्जा येईल मग! हो ना!"

मुलं जोरात ओरडली - "हो!"

मुलं प्रसन्न हसली. वर्गही पुन्हा जिवंत झाल्यासारखा वाटला. राग आवरला आणि पहिल्याच दिवशी वर्ग पुन्हा हसायला लागला. हळूहळू वैयक्तिक स्वच्छतेविषयीही मुलांना खेळातूनच माहिती द्यायला सुरुवात केली. परिणामही चांगला दिसून आला.

गटवार मांडणीने मुलं मुळाक्षरे शोधून वाचायला व लिहायला लागली. धडपडायला लागली. मीही नवीन शब्दांचा संग्रह पुठ्ठ्यावर लिहून त्यांच्यासमोर टाकत होतो. ते अधाशासारखे

ते आत्मसात करत होते.

एक-दोन आठवड्यातच शब्दांतून मुळाक्षरांची ओळख मुलांना झाली. शब्दपट्ट्याही आता धडाधड बोलू लागल्या होत्या. रागावण्यात व शिक्षा करण्यात मी खूपच खूप वेळ घालवला होता. तो भरून काढण्यासाठी अधिक वेळ काम करणं गरजेच होतं. निश्चित यशप्राप्तीसाठी कामाचे तास अधिक वाढवू या, असं ठरवून ही योजना प्रत्यक्षात आणायच ठरवलं. अधिक वेळ अधिक काम.

मुळाक्षरांची तोंडओळख चांगल्या ओळखीत बदलावी यासाठी काय काय करावं, याचा विचार मी करत होतो. घरी आल्यावरही हाच विचार डोक्यात होता. मला एक कल्पना सुचली. आपण सर्व मुळाक्षरांचे तक्ते तयार करून वर्गात लावले तर? पण ते क्रमाने नसावेत. अधून-मधून उलट-सुलट. कोणताही क्रम नसणारे, मुळाक्षरांचे ठळक आकार काढायचं ठरवलं.

काढलेले आकार मुलांकडूनच रंगवून घेतले तर? अरे व्वा! एक वाट सुचली की, अनेक वाटा सुचतात त्या अशा! चला कामाला लागायला हवं. आधीच वेळ थोडा राहिलाय.

मी कागद आणून सर्व पूर्वतयारी केली. आता काम बाकी होतं ते तक्ते रंगवण्याचं.

वर्ग म्हणजे 'आनंदवन' वाटू लागलं होतं. आजवर न उमगलेलं प्रेम खुणावत होतं. लहान मुलांत मन रमायला धडपडत होतं. मुळाक्षरं रंगवण्याची कल्पना मुलांना खूप आवडली. प्रत्येकाने एक-एक अक्षर रंगवलं. एक एक फूल चिकटवावं अशी ती मुळाक्षरं तक्त्यात चिकटवल्यासारखी वाटत होती.

तक्ता भिंतीवर सजला तेव्हा मुलांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. 'आपण रंगवलेला तक्ता' पाहून त्यांना डोंगराएवढा आनंद होत होता. मीही मनोमन खूप खूश होत होतो.

रागावर विजय मिळविल्यावरचा तो माझा पहिला पहिला विजय होता. म्हणजेच रागाचा पराजय तो माझा विजय! मित्राचे शब्द अजून कानात घुमत होते.

"तू राग आवरायला हवा. तोच खरा उपाय आहे."

◆

मस्जीद है बहुत दूर
चलो, यूँ करते हैं
किसी रोते हुए बच्चे को
हसाया जाय -

- निदा फाजली

प्रकरण ३

# धीरा पोटी...

तक्त्यांनी वर्ग सजला. मुलं फावल्या वेळेत खेळत-हसत मुळाक्षरं वाचत होती. लिहून सराव करत होती. माझ्या प्रयत्नांना यश येऊ लागलं होतं. मुख्याध्यापकांना वर्गात बोलावून सविस्तर माहिती देऊन, मुलांच्या प्रगतीचा अहवाल दिला.

"सर, हा नवीन उपक्रम आहे. माझ्या पाहण्यातही नाही आलं. मुलं प्रगती करताहेत चांगली गोष्ट आहे. असेच प्रयत्न करा. आम्ही हवी ती मदत करू."

"आभारी आहे सर! पण... मला दुसरीच चिंता खातेय."

"कसली चिंता?"

"मी या मुलांचा अभ्यासक्रम पूर्ण करू शकेन का?"

"सर, जमीन चांगली तयार झाली, तर पिकाला वाढायला वेळ लागत नाही. ते झपाट्याने वाढते. तुम्ही तसा प्रयत्न करा. पक्क्या पायावरची इमारत झपाट्याने उभी राहील. तुमचे प्रयत्न अव्याहत चालू द्या. यश तुमचंच आहे, हे लक्षात ठेवा."

मनातील शंका दूर झाल्या आणि मी सुटकेचा नि:श्वास टाकला. मला पहिल्यांदा जमीन तयार करायची होती. कसून मेहनत घ्यायची होती.

रोजचा नवा दिवस प्रगतीचं एक-एक पाऊल पुढंच टाकत होता; पण एके दिवशी आनंदाला छेद गेलाच. वर्गात आल्याबरोबर किलबिलाट करणारी मुलं आज शांतच होती.

"अरे! आज काय झालंय तुम्हाला? सगळे जण शांत का? मुलं हिरमुसली होऊन भिंतीकडे पाहू लागली. मी सहजच तिकडे पाहिलं आणि क्षणात सारा उलगडा झाल. भिंतीवर लावलेले तक्ते कुणीतरी फाडून नेले होते. अर्धवट चिकटलेले, फाटलेले तक्ते भकासपणे माझ्याकडे पाहत होते.

हताश होऊन मी खुर्चीत बसलो.

"सर आणि नवीन तक्ते लावू. या खिडक्यांना गज, दरवाजे असते तर असे झाले नसते."

मुलं माझी समजूत काढत होती की, दिलासा देत होती कुणास ठाऊक; पण खिडक्यांचं काहीतरी करणं भाग होत. ते काम राहूनच गेलं होतं. इतक्यात मुख्याध्यापक वर्गात आले.

"काय झालं? असं शांत का बसलाय सगळे जण?"

"काही नाही सर. या खिडक्यांचं काय करावं यांचा विचार करत होतो. ते पाहा कुणीतरी तक्ते फाडून नेलेत काय करावं?"

"धीरानं घ्या. असे छोटे-मोठे प्रसंग येतच असतात. म्हणतात ना - धीर धरा धीरापोटी।



फळे रसाळ गोमटी।'' शांत डोक्याने विचार करा. ही घ्या वही. आजची हजेरी भरून द्या.''

मुख्याध्यापक गेले; पण पुन्हा विचार करायला लावून गेले. झटपट सारं काही घडावं, अशी अपेक्षा ठेवणं चूक नाही; मात्र नुसत्या अपेक्षा ठेवून काम होत नाही. त्यासाठी थोडा धीर धरायलाच हवा. शांत डोक्यानेच उपाय शोधायला हवा.

घरी परतताना एका घराकडे माझं सहज लक्ष गेलं. साधं कौलारू घर. त्या घराच्या पाठभिंतीला असणाऱ्या खिडकीला गज नव्हते. त्याठिकाणी कुंपणाच्या काटेरी तारा उभ्या आडव्या गुंफून खिळे मारून पक्क्या बसवल्या होत्या. मनोमन मला ही कल्पना आवडली. मी काटेरी फांद्या लावाव्यात का? याचा विचार करत होतो; पण, आता मला उत्तर मिळालं होतं. जाता जाता त्या कौलारू घराने मला नवीन पाठ शिकवला होता. केवळ घाईने सर्व कामे करणं चुकीचं आहे. थोडा धीर धरून विचार केला, तर उत्तर सापडतेच सापडते.

दुसऱ्या दिवशी, शाळेत काटेरी कुंपणाची तार आहे का पाहावं म्हणून लवकरच शाळेत गेलो. शाळेच्या एका बंद खोलीत अडगळीचं सामान होतं. मुख्याध्यापकांकडून चावी घेऊन वर्ग उघडला. जूनं साहित्य अस्ताव्यस्त पडलं होतं. थोडंफार शोधल्यावर मला काटेरी तारांची मोठी गुंडाळी सापडली. एका जुन्या पत्र्याच्या डब्यात खिळे सापडले. गरजेचं साहित्य मिळालं. वर्ग बंद करून मी ते साहित्य माझ्या वर्गात घेऊन आलो.

इतक्यात एक सहकारी शिक्षक माझ्या वर्गात आले.

"सर, आज काय नवीन?''

"या खिडक्यांची तोंडं जरा बंद करतोय. दोन पायांच्या उंदीरघुशींचा उपद्रव जरा जास्तच वाढलाय.''

सहकारी मित्र हसले. मदतीसाठी पुढे सरसावले.

"सर, आणा आपण मापे घेऊन तुकडे करू तारांचे. आम्ही तुकडे करतो, तुम्ही तारांना खिळे मारून त्या बसवा.''

मी मनोमन खूश झालो. सहकाऱ्यांच्या मदतीने मला भारावून टाकलं होतं.

कामाला सुरुवात झाली. मापे घेऊन छिन्नीच्या मदतीने सहकारी मित्र तारांचे तुकडे पाडत होते आणि मी गज बसवावेत, तशा उभ्या आडव्या तारा खिळ्यांनी ठोकून पक्क्या बसवत होतो.

दुपारच्या जेवणाच्या सुट्टीपर्यंत काम पूर्ण झालं. सहकारी मित्र मुख्याध्यापकांना वर्गात घेऊन आले.

''मानलं सर तुम्हाला! छान कल्पना लढवलीत तुम्ही. आता तुमचे तक्ते फाटणार नाहीत. आता वर्ग पाहिजे, तसा सजवता येईल तुम्हाला.''

''सर, तुम्हीच शिकवलंत हे सारं करायला. मी एकटा काय करणार? सहकारी मित्रांचीही मोठी मदत आहे यात.''

''शिक्षक कधीही शिकवत नसतो. केवळ शिकतं करतो. सगळंच शिकवून चालत नाही. बाकीचं ज्ञान स्वत:च्या कौशल्यानेच मिळवावं लागतं. 'जो 'शिकतं' करतो तोच 'शिक्षक' आणि जो कौशल्य वापरून प्रगती साधतो तोच खरा 'विद्यार्थी'.

मुख्याध्यापकांचं हेही वाक्य लिहून घ्यावं असंच होतं. त्यात संकेत होते, विचारांना चालना देणारे; पण काय करायचे, हे सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून! ते केवळ शिकतं करत होते! शिकवण्याहून दोन पावलं पुढचंच!

* * *

वर्गाच्या खिडक्यांवर तारा सजल्या. भरपूर उजेड येत होता वर्गात. आता तक्ते लावायला हरकत नसावी. पुन्हा नव्याने तक्ते करायला घेतले. मुलांनी आनंदाने ते तक्ते रंगवण्याची जबाबदारी स्वीकारली.

भिंतीवर तक्ते सजले. आता उरलेल्या जागेत काय करावं? इंग्रजी मुळाक्षरांचे काही तक्ते तयार केले. त्यांनीही भिंतीवरची मोक्याची जागा पटकावली.

अडगळीच्या खोलीत काही जुने तक्ते सापडले. एका तक्त्यात भारतीय पक्ष्यांची माहिती होती. त्यातील काही सुस्थितीतील चित्रे मी कापून घेतली. राष्ट्रीय पुरुषांनाही जागा मिळाली. वर्ग मस्त सजला.

मुलांनी तर एवढी मदत केली की, त्यांचे आभार मानण्यासाठी त्यांना खाऊच द्यावा लागला.

वर्गात रोज नवी भर पडत होती. मुलं उत्साहाने भाग घेत होती. आजवर मी किती दुर्लक्ष केलं या मुलांकडे. चिलीचा कवी गॅब्रियल मिन्स्ट्रल याने म्हटलंय-

"आम्ही अनेक चुकांचे व दुष्कृत्यांचे अपराधी आहोत; परंतु आमचा सर्वांत वाईट अपराध कोणता असेल, तर तो मुलांकडे दुर्लक्ष करून त्यांना वाऱ्यावर सोडून देणं हा होय. गरजेच्या अनेक वस्तूंसाठी आपण थांबू शकतो, वाट पाहू शकतो; परंतु ते मुलांना शक्य नसते. त्यांच्या हाडांना आकार येण्याची, त्याचे रक्त घट्ट बनण्याची, जाणिवांची वाढ होण्याची हीच आत्ताची वेळ आहे. त्याला 'उद्या' हे उत्तर देऊन भागणार नाही. त्याचे नाव 'आज' आहे.

बालकाचे नाव 'आज' आहे, तो 'उद्याची' पहाट उजाडण्याची वाट पाहू शकत नाही. आजच त्याला शिक्षकाच्या प्रेमाची व आपलेपणाची गरज आहे. त्याची वंचना आणि त्याला नकार देणं म्हणजे घोर अपराधच होय!

मी तो अपराध केला होता; पण आता मुलांशी शिक्षक किंवा गुरू म्हणून नव्हे मित्र म्हणून वागत होतो. मुलांवर सूचनांचा नव्हेतर प्रेमळ आग्रहाचाच जास्त प्रभाव पडत होता. वर्गाच्या कामासाठी प्रत्येक जण आपला खारीचा वाटा उचलत होता.

* * *

वर्गात कचराकुंडी म्हणून कागदी खोकं आलं. प्रत्येक कागदाचा कपटा त्यातच पडत होता. अभ्यासातही मुलं प्रगती करू लागली होती.

राहून-राहून डोक्यात पुन:पुन्हा विचार येत होता अजून खूप काही करायचं काय करावं? याचा शोध मेंदू सतत घेत होता. तेव्हाच मुख्याध्यापकांचे शब्द पुन:पुन्हा मनावर उमटत होते. घाईघाईने सर्वच कामं होतात असं नाही- "धीर धरा पोटी। फळे रसाळ गोमटी।" म्हणतात हेच खरं...

◆

## काय करावं...

हसावं खेळावं
खूप बागडू द्यावं.
बालकास त्याच्या
मनासारखं वागू द्यावं...

मातीत खेळू द्यावं
पावसात भिजू द्यावं...
त्याच्याबरोबर आपणही...
चिंब होऊन गावं...

बालकांचं स्वातंत्र्य
हिरावून नये घेऊ
आशा, इच्छा, आकांक्षांचं
ओझं नये लादू...

टाकून नये बोलू
कमी नये लेखू
हसता, खेळता पडून उठता
मोठ्ठं द्यावं होऊ...

त्याच्या कलेकलेनं
हळू फुलू द्यावं
कळीचं फूल होताना
आपण मोहरून जावं...

**- मंगलारम व्ही. बी.**
(शिक्षणपत्रिकेतून साभार)

प्रकरण ४

# ऋतू बदलत आहेत...

मुलांच्या मदतीने वर्गाची सजावट पूर्ण झाली. मुलं अगदी मन लावून कष्ट करत होती. आजवर ज्या मुलांना मी मठ्ठ दगड म्हणत होतो, ही तीच मुलं आहेत का? याचाच मी विचार करत होतो. स्वत:मध्ये झालेले बदलही मी अनुभवत होतो. मी मुलांना जितकं प्रेम देत होतो, मुलं त्याच्या दुपटीने मला परत करत होती.

"मुलांनो, आता सजावट संपली. अजून काही बाकी राहिलंय का?"

"सर, भिंती आता चांगल्या दिसायला लागल्यात; पण फराऱ्या राहिल्याच." एकाने धाडस करून उत्तर दिले.

"फराऱ्या?"

"पताकांनाच फराऱ्या म्हणतोय तो!"

दुसऱ्याचं स्पष्टीकरण. वर्गात पताका लावायच्या राहिल्या होत्या. वाऱ्याबरोबर त्या झुळझुळताना पाहून मजा वाटते. मी पताकांचे कागद कापून आणण्याचे कबूल केले. मुलांचा आग्रह वर्गातच कापायच्या. रविवारी पताका लावण्याचा कार्यक्रम नक्की झाला.

रविवारी वर्गातल्या पताका लावण्याचं काम धूमधडाक्यात पार पडलं. इतर सहकारी मित्रांनी टोमणे मारलेच, "यांचं आपलं काहीतरी नवीनच! आधी पोरांना सुधरवा मग वर्गाच्या मागं लागा म्हणावं?"

अशा बोलण्यांनी मी थोडा दडपला गेलो खरा; पण वर्गच जर प्रसन्न नसेल, तर मुलं तरी कशी काय प्रसन्न राहू शकतील? त्यांचं शिकवण्याकडे - शिकण्याकडे तरी कसं लक्ष लागावं? वर्ग सजावट हा तुमच्या वर्गाचा अभिन्न भाग आहे. त्यातही कौशल्याची कसोटी आहे. कल्पकतेची परीक्षा आहे. केवळ वस्तू मांडून ठेवणे म्हणजे सजावट नव्हे. त्यांचा वापर

हा झालाच पाहिजे.

पताकांची सळसळ मुलांना जो आनंद देते, तो आनंद त्यांच्या अनुभवाचाच भाग असतो. तुम्हा आम्हाला त्यात विशेष असं काहीच वाटणार नाही. त्यात ती त्यांनी स्वत: लावली तर त्यांचा आनंद काही औरच!

सहकाऱ्यांच्या बोलण्याकडे वर्गाच्या शैक्षणिक प्रगतीबाबत मी जास्तच गंभीर झालो. रागावणं कमी झालंच होतं. मुलांना हळूहळू शिस्त लागू लागली होती; परंतु दैनंदिन अभ्यासाकडे मुलं वळायला तयार नव्हती.

वाचनासाठी जुनी पद्धत वापरणं मला नको होतं. मुलांना वाचन हे शब्दांच्या माध्यमातून शिकवावं, हे मी आधीच ठरवलेलं होतं. सुट्या अक्षरांना काहीच अर्थ नसतो. केवळ अक्षरे गिरवणे त्यांना कंटाळवाणे वाटते. त्यातून काहीच समाधान होत नाही; पण शब्दांना अर्थ असतो. त्यामुळे मुलांचा शिकण्यातला रस टिकून राहतो. वाढतो. एका अक्षरासाठी एकच शब्द न घेता मुलांकडून अनेक शब्द घेत मी पुढे जात होतो.

याचा एक फायदा झाला, तो म्हणजे कोणताही क्रम गृहीत न धरता मुलं अधली मधली अक्षरे ओळखू लागली. वाचताना काना-मात्रा, उकार, वेलांटी, मात्रा यांचा सराव होऊ लागला. म म मगरीचा त्याला एक काना 'मा' ही अर्थहीन वाचण्याची पद्धत हळूहळू बंद झाली. सरळ 'मा' असा उच्चार करण्याचा सराव होऊ लागला. वाचनात सलगता यायला मदतच झाली. वाचनाचा वेग वाढला.

सोप्या शब्दांवरून वाचनाचा ओघ सोप्या वाक्यांवर आला. मुलांच्या परिचयाचीच वाक्ये देऊन त्यांना वाचनासाठी तयार केलं. ती वाक्ये आपली वाटली म्हणूनच वाचनाची आवड वरचेवर वाढत गेली.

* * *

वाचनासाठी म्हणून काही छोटी-छोटी मोठ्या अक्षरांतील पुस्तकं मी वाचनालयाच्या कपाटातून काढली. धूळ झटकली. मुलांना वाचायला दिली. पूरक वाचनाने वाचन सुधारते,

यावर माझा पूर्ण विश्वास होता. आहे. चांगलं वाचू शकणाऱ्या मुलांना पुस्तकांचं वाटप केलं. ज्यांना वाचताना अडचणी येत होत्या, त्यांचा एक स्वतंत्र गट बनवून त्यांच्या हवाली सगळ्या शब्दपट्ट्या-वाक्यपट्ट्या करून टाकल्या. आता त्या त्यांच्याच मालकीच्या होत्या.

"मुलांनो, तुम्हाला दिलेली गोष्टीची पुस्तके आपल्याच शाळेची आहेत. म्हणून तुम्ही ती काळजीपूर्वक वापरायला पाहिजेत."

"सर, आम्ही काळजीने वाचून परत आणून देऊ" एक चुणचुणीत मुलगा उत्तरला.

"शाब्बास! ज्यांना शक्य असेल त्यांनी पुस्तकांना पुठ्ठा (कव्हर) घाला. त्यामुळे पुस्तकं चांगली राहतील. राखाल त्यांची निगा?"

"होय सर! आम्ही पुस्तकं काळजीपूर्वक वापरू."

मुलांवर विश्वास टाकायला मला मुलांनीच शिकवलं होतं. या वेळीही मी तेच केलं.

दुसऱ्या दिवशी पुष्कळ जणांनी पुस्तकांना पुठ्ठे घालून आणले होते. मुलांवर विश्वास टाकला, तर ते खूप काही करू शकतात. आपण याच गोष्टीचा वापर करून जास्तीत जास्त फायदा घेतला पाहिजे. मी मनात ठरवत होतो व मुलं ऋतू बदलल्यासारखी बदलत होती.

* * *

वाचनाचा छंद जडला खरा; पण काहींनी पुस्तकांची दुरवस्था करून टाकली होती. राग आला; पण त्यावर नियंत्रण ठेवायला चांगलंच जमू लागलं होतं. फाटलेली पुस्तकं त्याच मुलांना चिकटवायला लावली. शिक्षेचाच हा प्रकार! पण मुलांना पुस्तक फाडलं की, आपल्यालाच चिकटवावं लागतं, त्यापेक्षा पुस्तक काळजीपूर्वक वापरलेलं बरं, हा धडा मिळाला. एखाद्याकडून चुकून जरी पुस्तक फाटलं तरी तो गुपचूप चिकटवून आणून कपाटावर ठेवून द्यायचा.

शिस्त जोवर स्वयंशिस्त बनत नाही तोवर तुमचा त्रागा हा निरर्थकच असतो, याचीही जाणीव मला होऊ लागली होती. मुलांना शिस्त लावता-लावता मीही स्वत:ला शिस्त लावत होतो.



वाचन सुरू झालं; पण अजून लेखन, संख्या ओळख बाकी होती. त्यावरही काहीतरी उपाय शोधणं आवश्यकच होतं. वाचू शकणारी मुलं लिखाणात नेमक्या चुका करत होती.. काना, मात्रा, उकार, वेलांटीचा मेळच बसत नव्हता.

वर्गात मी मुलांना दोन-दोन रेघी पाच ओळी आखायला लावल्या. मुलं अचंब्याने माझ्याकडे पाहू लागली. 'हे काय नवीनच' हाच प्रश्न त्यांना पडलेला असावा.

"सर, ओळी कशाला?"

"अरे, आता तुम्ही वाचायला शिकलात. त्याचबरोबर लिहायलाही जमलं पाहिजे की नाही?"

"हो! जमलंच पाहिजे. सांगा सर वाक्य लवकर"

मुलांचा उत्साह ही आपल्या कामाची निम्मी यशस्विता असते, हे अनुभवाने जाणलं होतं. अवघड वाक्ये सांगून मुलांना सुरूवातीलाच खचवून न सोडता सोपी साधी जोडाक्षरविरहित वाक्ये सांगायला सुरुवात केली. दुरेघीत अक्षरांचा दोन्ही रेषांना स्पर्श झालाच पाहिजे, असा सज्जड दमही दिला अर्थात प्रेमळ

"सर खूप सोप्पंय हे!" एक उत्साही स्वर.

"असं, मग बरोबरच लिहून दाखवणार ना तुम्ही सगळेजण मला?"

"होऽऽऽ!"

माझी अपेक्षा होती सर्वजण बरोबर लिहितील; पण थोड्याच वेळात अनुभव आला. अर्ध्याहून अधिक मुलं लेखन चुकली होती. मनात आलं, यांना शिकवावं तरी कसं? काहीच कसं येत नाही? असं वाटणंही साहजिक होतं; परंतु वाटून घेऊन चालणारही नव्हतं. सरावाने सर्व चुका नाहीशा होतात. मग आता तर कुठे सुरूवात आहे. असाच रोज सराव घेतला, तर निश्चित फायदा होईल; पण मला लवकरच अनुभव आला की, मुलांच्या काही चुका कायम राहिल्यात.

लेखनाबाबत काही ठोस करावं लागणारं होतं. त्याबाबत फारसं काहीच वाचनात आलं नव्हतं; पण त्यासाठी वाट्टेल ती मेहनत घ्यायची तयारी होती. मधल्या सुट्टीत असाच विचार करत असताना वर्गात दोन मुलांचा संवाद चालला होता.

"चल आखून घे पाटीवर दोन रेघी पाच ओळी. मी तुला वाक्ये सांगतो."

"तू लिहिणार नाही का?"

"मी पण लिहिणार. माझी पाटी तू तपास. तुझी पाटी मी तपासतो."

सहज घडलेला हा संवाद; पण माझ्या प्रश्नाचं इतक्या सहजतेने उत्तर देऊन गेला की, मलाही आश्चर्य वाटल्यावाचून राहिलं नाही. ज्याची उत्तरं मी पुस्तकात शोधत होतो, त्यांची जिवंत उत्तरं माझ्या वर्गातच वावरत होती.

त्याचवेळी कागदावर 'लेखन उपक्रमाचे' मुद्दे झरझर उतरू लागले. सर्वच मुलांचं लेखन तपासणं मला शक्य होत नव्हतं. मुलंही पाटी दाखवण्यात कंटाळा करत होती; पण यावर सर्वोत्तम नाही; पण चांगला उपाय सुचला होता. लेखनाच्या प्रगतीत त्याचा निश्चितच फायदा होणार होता.

प्रार्थना झाली. मुले वर्गात येऊन बसली. पूर्वीएवढा गोंधळ आता वर्गात होत नव्हता. मुलं कशात न कशात गुंतून पडत होती. विद्यार्थ्यांना समजून घेऊन त्यांच्या कलेनेच स्वत:ची अध्यापनाची कला बदलणं, हा नवा पाठ मी शिकत होतो.

"विद्यार्थी म्हणजे जिवंत पुस्तक! शिक्षकाने त्या पुस्तकाचं पान न पान वाचून काढावं. अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या जीवनाचा अभ्यास वा वाचन झाल्यावर शिक्षकाला आपलं नियोजन, शिकवण्याची पद्धत आणि इतर उपक्रम योजण्यास मदतच होते."

कदाचित याच शब्दांनी मुलांना समजून घेऊन अध्यापन करण्याची मला प्रेरणा दिली होती.

मुलांना नेहमीप्रमाणे पाटीवर रेषा आखायला लावल्या. शब्दांची पुनरावृत्ती टाळून, एक वाक्य एकदाच; पण सावकाश उच्चारायला सुरूवात केली. त्यातच श्रवणाचं कौशल्य पक्कं होण्यास मदत झाली. शब्द काळजीपूर्वक ऐकणे, त्याचं आकलन होणं व उच्चारानुसार लेखन करता येणं या बाबीही पूर्ण होणार होत्या.

वाक्य लिहिताना मुलांचा उडणारा गोंधळ मी पाहत होतो. तरीही मी शब्दांची व वाक्यांची पुनरावृत्ती टाळली. सुरूवातीला हे कठीण जाणार होतं; मात्र सततच्या सरावाने पुढे हेही साध्य झालं.

"झाली का वाक्ये लिहून?" मी प्रश्न केला.

सगळ्याच मुलांची वाक्ये लिहून झाली नव्हती. ज्यांची झाली ती होकारली.

"आता एकमेकांच्या पाट्या एकमेकांना द्या. मी फळ्यावर पाचही वाक्ये लिहितो. तुम्ही चुका शोधून त्यांना गोल करा आणि दुरुस्त्या करून घ्या."

मी वाक्ये फळ्यावर लिहिली. मुलांनी तपासून चुकीच्या शब्दांभोवती गोल काढले. दुरुस्त्याही करून घेतल्या. लेखनाच्या सुरुवातीला (माझ्या दृष्टीने ही मुलांची सुरुवातच होती.) काना-मात्र्यांच्या चुका ह्या 'गंभीर गुन्हा' समजू नये. उलट अशा चुकांतून मूल पुढं शिकत जातं, हे मॅक्झीन बर्नसन (मॅक्झीन मावशी) यांचे विचार इथं उपयोगी ठरले. शब्द ऐकून त्यांचा उच्चार व उच्चारानुसार लेखन ही क्रिया लेखन कौशल्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावते.

लेखनाचा सराव हा दररोजचा पहिला तासच झाला. हळूहळू लेखन करणाऱ्या मुलांचा वेगही वाढला आणि चुकांचे प्रमाणही कमी झाले. सर्वच मुलं चुका टाळू लागली, असं मी म्हणणार नाही, काही मुलं अजून चुका करतच होती. त्यांना जास्तीत जास्त सराव देणं गरजेचं होतं.

आठवड्याचा प्रत्येक शनिवार हा केवळ वाचनासाठीच होता. तोही अवांतर वाचनासाठी. छोटी-छोटी गोष्टीची पुस्तकं, कथामाला, वर्तमानपत्रातील गोष्टी इत्यादींचही वाचन चालू ठेवलं.

खेडेगावातील शाळा असल्याने, मुलांच्या बोलण्यात संवाद भाषेतील शब्दांचं प्रमाण जास्त असायचं. पुस्तकात मात्र माध्यम भाषा. त्यामुळे बऱ्याचदा माझी भलतीच गोची व्हायची. मुलांची अवस्थाही फार वेगळी नव्हती.

संवाद भाषेबरोबर मुलांना माध्यम भाषाही चांगली माहिती असणं गरजेचं होतं. त्यासाठी काही वेगळं करून पाहायचं होतं. संवाद भाषेला नावं ठेवत माध्यम भाषेला जास्त महत्त्व देणं मला पटेना. मुलांना त्यांच्या भाषेत लिहायला लावलं तेव्हा मुलं आनंदाने लिहायला तयार झाली. सोपी साधी भाषा असलेली पुस्तकं वाचत होती. माध्यमभाषाही समजून घेण्याचा प्रयत्न चालला होता.

शाळेव्यतिरिक्त मिळणाऱ्या वेळेत नवीन काही घडत होतं. मुलं स्वतःचं कौशल्य पारखून कमी पडणाऱ्या कौशल्यांना धार लावत होती. वाचन-लेखनानंतर आता भाषणाकडे

वळलो. तसे पाहता श्रवण व भाषण ही दोन अनौपचारिक व उपजतच कौशल्यं. ती हेतुपुरस्सर शिकावी लागतात.

वाचनासाठी किंवा फलकावर लेखनासाठी पुढं यावं लागे. त्यामुळे समूहासमोर उभारून एखादी कृती धीटपणाने करणे परिचयाचे झाले होते.

"आपण वाचलेल्या पुस्तकाविषयी कमीत कमी पाच ओळी पुढं येऊन बोलता यायला पाहिजेत."

असं म्हणताच मुलं कावरीबावरी झाली. त्यातून एक धीट मुलगी पुढं आली.

"काल मी आपल्या मराठीच्या पुस्तकातले सगळे धडे-कविता वाचून काढल्या. मला 'सांकव' आणि 'पत्र' हे दोन धडे खूप आवडले. कविताही चांगल्या आहेत. मी सगळ्या कविता पाठ करायचं ठरवलंय"

झालं! बोटावर मोजाव्यात इतक्या ओळीच. ती बोलली; पण आपण वाचलेलं दुसऱ्यांना सांगू शकतो, त्यात एक मज्जा आहे, हे तिनं दाखवून दिलं. यात नोंदवावी अशी एक महत्त्वाची बाब आहे, ती म्हणजे सर्वांसमोर आपण जाऊन बोलू शकतो, याचा विश्वास त्यांना वाटला.

आजवर परिपाठात कधीही सहभागी न होणारी इ.४ थीची मुलं प्रार्थना, कथा, सुविचार सांगण्याची संधी सोडेनाशी झाली. मुलांतला हा बदल पाहून मुख्याध्यापकही आनंदले. प्रार्थना संपवून मुले वर्गात गेली. मुख्याध्यापकांनी मला जवळ बोलावले.

"ज्या वर्गाला केवळ दंगामस्ती करणारा वर्ग आम्ही समजत होतो, त्या वर्गातील मुलांना प्रार्थना म्हणताना, सुविचार-गोष्टी सांगताना पाहून आनंद वाटला. तुमच्या प्रयत्नांना यश येतंय. एकंदरीत ऋतू बदलत आहेत तर! आनंद आहे."

◆

या फुलांनी या मुलांनी
आत्मविश्वासा दिले
पाकळ्यांनी या कळ्यांनी
फुलूनी आम्हा फुलविले...

हे असे का ते तसे ना..
सतत आम्हा छेडियले
शोधकार्यावरती आम्हा
हात धरून चालविले.

मी व माझे काही न म्हणती
म्हणती 'आपण' 'आपुले'
मीपणाच्या पल्याड जाण्या
आम्हास त्यांनी शिकवले.

उजळले जे सुप्त होते
सहवास तुमचा लाभता.
शिकवले नि शिकत आहे
आम्हास जे ना आकळे...

**-निर्मला पोतनीस**
**-प्राचार्य लीलाताई पाटील**
'पालकनीती'तून साभार..

प्रकरण ५

# एवढ्याने खचून कसं चालेल...

वाचन-लेखनाचा कार्यक्रम यशस्वी व्हायला लागला, तसा माझाही उत्साह वाढायला लागला. आपण ठरवलेली गोष्ट पूर्ण करतोय, याचा आनंदही औरच होता. मुलांचाही उत्साह वाढला होता. आपण वाचू शकतो, लिहू शकतो, हा आनंदच त्यांना शांत बसू देत नव्हता, सतत काही ना काही वाचन-लिहीत राहणं त्यांनाही आवडू लागलं.

गणितात मात्र मुलांची म्हणावी तशी प्रगती होत नव्हती. अंक ओळखण्यात मुलं भरमसाठ चुका करत होती. वेळ भराभर जात होता. प्रगती मात्र जिथल्या तिथेच होती. अंकपट्ट्या, तक्ते सर्व साधनांचा वापर केला. अंकाचे मोठ्याने वाचन घेऊन पाहिले; पण हवं ते साध्य होत नव्हतं.

अशात एक दिवस आमच्या शाळेत अधिकारी आले. मुख्याध्यापकांशी चर्चा करून त्यांनी चौथीचा वर्ग पाहायचा असल्याची इच्छा व्यक्त केली. मला याची कल्पना नव्हती. मी वर्गात गटाने संख्या ज्ञानाचा सराव घेत होतो.

मुख्याध्यापक वर्गात आले.

"सर, साहेब आले आहेत. त्यांना चौथीचा वर्ग पाहायचा आहे. तुम्ही तयारीत असा."

मी कमालीचा घाबरलो.

"पण सर, वर्गाची तयारी?"

"जेवढी झालीय ती त्यांना सांगा. त्यावरच ते प्रश्न विचारतील"

त्यातल्या त्यात एवढं बरं वाटलं; पण मी अजून एकही पाठ शिकवला नव्हता. भीतीने पोटात गोळाच आला. शरीराला कंप सुटला. थरथर जाणवू लागली.

"मुलांनो जेवढी जमतील तेवढी उत्तरे अगदी न घाबरता द्या."

मुलांनाही माझ्या अवस्थेची जाणीव झाली असावी. तीही थोडी घाबरलेलीच होती. तरीही माझ्या चेहऱ्यावरचं हास्य त्यांना दिलासा देत होतं आणि म्हणत होतं "don't worry" मैं हूँ ना!''

अधिकारी वर्गात आले. मुलांनी त्यांचं स्वागत केले. अधिकाऱ्यांनी वर्ग कोणता काय, अशी प्राथमिक चौकशी करून सरळ प्रश्न विचारायला सुरुवात केली.

एकाही मुलाला नीटसं उत्तर देता येईना. एखाद्याने अडखळत काही सांगण्याचा प्रयत्न केला, तर अधिकारी महाशय त्याला हेटाळणीच्या स्वरात खाली बसवायचे.

प्रश्नांची सरबत्ती संपतेय न संपतेय तोवर त्यांनी गणित सांगायला सुरूवात केली. माझा जीव घाबराघाबरा झाला. गणिताची अवस्थाही वेगळी नाही झाली.

अधिकारी महाशय खूप चिडले.

''काही शिकवलंय की नाही सर तुम्ही यांना? की नुसती वर्ग सजावटच करत होतात शाळा सुरू झाल्यापासून,''

''पण साहेब जरा ऐकून...''

''काही बोलू नका. कारणं सांगून चालत नाही.''

खूप वाईट वाटलं. अधिकारी तणतणतच ऑफिसात निघून गेले. मला तर मेल्याहून मेल्यासारखं वाटत होतं. मी खुर्चीत हताश होऊन कोसळलो. टेबलावर टोकं टेकवलं. खूप आवरलं स्वत:ला. मुलांसमोर रडलो, तर तेही मला कच्च्या मनाचा समजतील. मग मी त्यांना संकटांना धैर्याने तोंड द्या, हे कोणत्या तोंडाने सांगणार? मी डोकं वर केलं तेव्हा वर्गातील सगळी मुलं माझ्याभोवती गोळा झाली होती.

''सर, साहेब तुमच्यावर रागावले का?''

''नाही रे! साहेब म्हणाले, अजून तयारी करून घ्यावी लागेल.''

''सर, आम्ही करू तयारी. आमच्यामुळे साहेब तुम्हाला बोलले.''

एरवी कलकलाट-गोंधळ करणारी ही मुलं आज खूप शहाण्यासाठी बोलत होती. समजूतदार झाली होती.

मी उठलो. अधिकारी महाशय गेले होते. ऑफिसमध्ये सहशिक्षकांची चर्चा जोरात सुरू होती. मी पाऊल टाकताच चर्चा थांबली.

"म्हणून सर, आम्ही नेहमी म्हणतो, ह्या उपक्रमांनी काही होत नाही. दिखाऊ सगळं. परिणाम काय? तर साहेबांची बोलणी.

आम्ही एवढ्या वर्षे नोकऱ्या करतोय ते का उगीचच? नव्या लोकांना काय वाटतं जणू आपलं तेच योग्य! असो, आम्हाला काय त्याचं!"

एक सहकारी हसत-हसत बोलले. त्यांचा रोख माझ्या लक्षात आला. सर्वजण बाहेर पडले. मी तिथंच बसून होतो.

"सर, एवढं मनाला लावून घेऊ नका. अशी बोलणी पचवूनच पुढं जायचं असतं."

"पण सर, साहेबांनी माझं काहीही ऐकून घेतलं नाही. उलट मलाच नको नको ते बोलले."

"समजलंय मला. सुधारणा करा म्हणाले, "सर, माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे."

"मी प्रयत्न करतोच आहे; पण मला अजून यश मिळेना."

"एक सांगू. यश म्हणजे अंतिम निकाल नव्हे. आपल्या प्रयत्नांचा दर्जा सतत वरचा राखणे म्हणजे खरं यश! यश मिळवण्याची, यशस्वी होण्याची भावना प्रत्येकाच्या मनात असतेच. हीच भावना आपल्यासमोरील आव्हानांवरून आपलं लक्ष हटवते. यश किंवा अपयश हे आपल्या प्रयत्नांना येत असते. आपल्याला नाही.

लक्षात ठेवा, अनेक संकटं समोर वाढून ठेवलेली असतात. आव्हानं द्वंद्वाला तयार असतात; परंतु आपले संकल्प आणि आपली श्रद्धा आपल्याला जी वाट दाखवतील ती वाट चालणे हे एक व्रतच आहे. ते कठीण आहे; मात्र अशक्य नाही! ते जर व्रत आपण जपलं

तर आपण यशस्वी झालोच म्हणून समजायचं.

अशा छोट्या-मोठ्या प्रसंगांवरून यशापयश ठरवू नका. यशाची वाट अपयशाच्याच मार्गाने जाते, हे विसरू नका. तुम्ही नवीन आहात. ही तर तुमची शिकण्याची सुरुवात आहे. तुम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करा. यश-अपयश ह्या बेगडी कल्पनाही गळून पडतील.

एवढ्याने खचणं बरं नाही. अजून खूप आव्हानं झेलायची आहेत. पेलायची आहेत. धैर्याने सामना करा. मी आहे सोबत.''

एखाद्या तत्त्वज्ञानं समोर बसून आपले मौलिक मार्गदर्शन करावं, तेवढ्याच ताकदीनं मुख्याध्यापकांनी माझ्या नैराश्याच्या जळमटांना झटकून टाकलं.

मी एक कृतज्ञतापूर्वक दृष्टी मुख्याध्यापकांकडे टाकली. त्यांनीही मंदसं हास्य केलं. मी नव्या उमेदीने उठलो. वर्गाकडे जायला निघालो.

* * *



उत्तरं दिली नाहीत म्हणून मुलांना रागवावं म्हटलं तरी मला ते जमलं नाही. उलट त्या प्रसंगानंतर मुलं माझ्या जास्तच जवळ आली.

गणिताची गोडी वाढावी म्हणून मी वर्गात एक खेळ घ्यायचं ठरवलं - "गणित सोडवा भेट मिळवा."

मुलं सुरुवातीला गोंधळली. गणित सोडवायचं आणि वस्तू घ्यायची. खेळ तर सोपा होता; मात्र गणितं कसली येतील? अवघड आली तर सोडवायची कशी?

काही जणांनी खेळात भाग घेण्याची तयारी दर्शवली.

"मुलांनो या खेळाचे नियम अगदीच सोपे आहेत. या चार वाट्या तुमच्यासमोर मांडून ठेवल्या आहेत. पहिल्या वाटीत बेरजेच्या उदाहरणांच्या चिठ्ठ्या आहेत. दुसऱ्यात वजाबाकी, तिसऱ्यात गुणाकार व चौथ्यात भागाकार. जो मुलगा-मुलगी चार वाट्यांतील एक-एक गणित सलग सोडवून दाखवेल त्याला एक अख्खी पाटीवरची पेन्सिल बक्षीस मिळेल.

जे सलग आठ उदाहरणे सोडवून दाखवतील त्यांना दोन पेन्सिली बक्षीस म्हणून मिळतील. कुणी एखादं उदाहरण चुकला, उदा. अजय भागाकाराचं उदाहरण चुकला, तर मी त्याला उदाहरण समजावून देईन; पण अजयला त्याच पद्धतीची दोन उदाहरणं सोडवून दाखवावी लागतील. आहे कबूल?"

मुलं बुचकळ्यात पडली. होय म्हणावं की नाही? होय म्हणावं, तर गणितं सोडवावी लागतील, नाही म्हणावं तर पेन्सिली जातात. सर्वांनी मिळूनच उत्तर दिलं - "हो! कबूल आहे!"

वाट्यांत ठेवलेल्या चिठ्ठ्यांत अगदी सोपी-सोपी उदाहरणं दिली होती. खेळांतून त्यांच्यात गणिताविषयी गोडी निर्माण करण्यासाठी हे करावंच लागलं.

पहिल्या फेरीत कुणीच बक्षीस मिळवलं नाही. मुलं हिरमुसली.

"अरे, प्रयत्न करा. सोपी आहेत उदाहरणे. सहज जमतील तुम्हाला."

या आधीही सर्व क्रिया घेतल्या होत्या; मात्र सरावाअभावी मुलं चुकत होती.

काही मुलांनी पुन्हा प्रयत्न केला. बेरीज-वजाबाकी सहज सुटू लागली; पण बक्षीस कुणालाच मिळाले नाही.

आपण चार क्रिया एकदम घेऊन चूक तर केली नाही ना? हा विचार मनात आला. मग ठरवलं, प्रथम बेरीज व वजाबाकीच घ्यावी.

मी गुणाकार भागाकाराच्या वाट्या बाजूला ठेवून दिल्या. मुलांनी - "अरे व्वा!!" म्हणून आपली प्रतिक्रिया नोंदवली.

"मुलांनो गुणाकार - भागाकार तूर्त बाजूला ठेवू. आता फक्त बेरीज-वजाबाकीचा खेळ होईल. त्यांचेही काही नियम तुम्हाला पाळावे लागतील."

सलग चार उदाहरणे सोडवणाऱ्याला एक पेन्सिल मिळेल, सलग आठ उदाहरणे सोडवणाऱ्याला दोन पेन्सिली मिळतील.

मुलांनी उत्साहाने भाग घेतला. जे चुकले त्यांनी पाटीवर उदाहरणे सोडवून दाखवली.

बेरीज-वजाबाकी पाहता-पाहता मुलांना प्रिय झाली. जो तो उदाहरणेच सोडवू लागला. बेरीज-वजाबाकीच्या माध्यमातून संख्याज्ञान, एकक-दशक-शतकाची ओळख करून देणं सोपं गेलं.

स्थानिक किमतीसाठीही अशाच एका खेळाची योजना करावी लागली. आपण काहीतरी शिकत आहोत, यापेक्षा आपण खेळत आहोत, हीच भावना त्यांच्या मनात होती. त्यामुळं शिकणं अवघड वाटतच नव्हतं.

झालेल्या भागावर एखादी चाचणी घ्यावी, असं मी ठरवलं. चाचणी झाली; पण मुलांनी अपेक्षाभंगच केला. मुलांना उदाहरणे नीट सोडवता आली नाहीत. साध्या साध्या चुका केल्या होत्या.

मी पुन्हा हताश झालो. मेहनत घेऊनही फळ मिळत नव्हतं. निराशेचे ढग जमू लागले होते.

मी हताश झाल्याचं पाहून मित्राने सहज छेडलं.

"तुझ्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत ना?"

"हो! खूप प्रयत्न करूनही जमेना."

"मुलांनी चुका केल्या खरंय; पण ज्याचा त्यांना सरावच नव्हता ते करताना ती घाबरणारच!"

"पण, मी सरावही भरपूर घेतला होता. साधी बेरीज वजाबाकीही चुकले."

"मी अभ्यासाच्या सरावाचं बोलत नाही. मी बोलतोय ते चाचणीविषयी. मुलांची लेखनाची सवय वाढायला हवी. चाचणी घ्यायची; पण त्याला स्वरूप परीक्षेसारखं देऊ नये. सहज वर्गात बसून गणितं सोडवल्यासारखं त्यांना वाटलं पाहिजे.

हसत-खेळत शिकताहेच तशीच ही परीक्षाही देतील. होईल हळूहळू सराव. एवढ्या छोट्या छोट्या बाबींनी खचणं बरं नाही. तू तळमळीने करतोस म्हणून तुला वाईट वाटते, तू प्रामाणिकपणे प्रयत्न करतोय तोवर मुळीच चिंता करू नकोस.

मुलांना काही जमत नाही. तेव्हा आपण आपल्या पद्धतीत बदल करायला हवा. स्वत:त बदल घडवायला हवा."

* * *

हा नवा पाठ होता माझ्यासाठी. सरधोपट मार्ग न स्वीकारता स्वत:त बदल घडवत गेल्यास योग्यच आणि हवी ती फलनिष्पत्ती मिळते.

असे अनुभव कधी मित्र, कधी मुख्याध्यापक, तर कधी पुस्तकांच्या रूपाने पदोपदी भेटत राहिले. म्हणूनच हा प्रारंभाचा प्रवास सुखद तर झाला.

जीवनातलं अनुभवानं मिळालेलं जिवंत तत्त्वज्ञान वेळोवेळी प्रत्येक प्रसंगात उपयोगी पडलं. आव्हानांना सामोरं जाण्यासाठी मनाला धैर्य देत गेलं. पुढच्या वाटचालीची दिशा आणि दशा निश्चित करत गेलं. यशाचा व प्रयत्नांचा खरा अर्थ समजावत गेलं. वाट सुकर करत गेलं.

◆

सप्रेम नमस्कार,

तुमच्यामुळेच अंधारातून बाहेर आलो.
सुरेख पहाटेच्या दारात पोहोचलो.
तुमच्यामुळेच....
रात्र किर्र होती, उरात भीती होती,
पण,
तुम्ही दिलेल्या शब्दांची साथ होती...
दिलेल्या सहकार्याची सोबत होती..
म्हणूनच मातीत रुजलो आहे..
आणि समृद्ध झाड बनलो आहे.
पानोपानी इतरांकरिता वाढतो आहे..
पुन्हा पुन्हा बहरतो आहे,
ते तुमच्यामुळेच, तुमच्यामुळेच....

**-अनुताई भागवत**

प्रकरण ६

# हसत खेळत शिक्षण...

खेळाच्या माध्यमातून बेरीज-वजाबाकी तर पक्की झाली; परंतु गुणाकार-भागाकारासारखा भाग सहजा-सहजी जमेलसा वाटेना. तरीही थांबलो नाही. टेपरेकॉर्डरच्या साह्याने मुलांना संगीताच्या तालावर गायलेले पाढे ऐकवले. सुरूवातीला ताल जमेना; पण मधल्या सुट्टीत टेप चालू करून मुलं स्वत:च कॅसेट ऐकू लागली. सहकाऱ्यांनी आक्षेप घेतला. मुख्याध्यापकांनी पूर्ण सहकार्य केलं. मुलं टेपरेकॉर्डर व्यवस्थित हाताळत होती. सेलवरचा असल्याने सुरक्षितही होता.

मुलांनी १० पर्यंतचे पाढे आठवड्यात पाठ केले. काही चुणचुणीत मुलांनी २० पर्यंतचे पाढे पाठ केले. गुणाकार व भागाकारासाठी कमीत कमी १० पर्यंतचे पाढे अपेक्षित होते. मी गुणाकार पद्धतीने पाढे घ्यायला सुरुवात केली.

२ x १ = २ म्हणजे बे एके बे. ही गुणाकार पद्धत परिचयाची झाली. हवेत अंक लिहून सराव करता येतो, हे समजताच मुलांना तो छंदच जडला. हवेतले पाढे, गणितं सुरू झाली.

गुणाकार करणं एकदम सोपं झालं. वर्गात कधीच लक्ष न देणारी मुलंही पटापट उदाहरणं सोडवू लागली. पाढ्यांचा प्रवास पुढं चालूच होता. गुणाकाराचा गड सर झालाच होता. आता भागाकाराचं लक्ष्य दूर नव्हतं.

गणिताबरोबरच भाषा, विज्ञान व समाजशास्त्र हे विषयही एक-एक पायरी पार करत पुढं सरकत होते. विज्ञानातील बराचसा भाग प्रयोगाचाच होता. मुलं स्वत:ही आनंदाने सहभागी झाली.

एकदा खेळाच्या तासाला मुलांनी मला शाळेच्या मागं उगवलेलं टोमॅटोचं रोपटं दाखवलं. त्याला फुलं आणि फळंही आली होती. सहज जाता-जाता वनस्पतींचे अवयव आणि त्यांची



कार्ये हा घटक मुलांना स्वतःहून शिकता आला. कायम लक्षात राहिला. त्याला कारण होतं 'हसत-खेळत शिकणं'.

भाषा विषयातील कविता मुलं सुंदर चालींवर गात होती. एकदा मुलं, मग मुली. अशी मजेदार स्पर्धा लावली की, मुलं उत्साहाने कविता गायची. प्रत्येकाला पुढं बोलावून कविता गायला लावा, हा मुलांचा अट्टहास!

"का?" असं विचारलं तर समजलं,

"सगळे जण एकदम कविता म्हणताना काही जण म्हणत नाहीत. कारण त्यांची कविता पाठच नसते."

हे नवीन तंत्र मुलांनीच शिकवलं. थोडं वेळखाऊ होतं; मात्र होतं खूप मजेदार. त्यातून

मुलांच्या काही चुका लक्षात आल्या. त्या दुरुस्त करण्याचं कौशल्य शिकून घेता आलं. मुलांचं शिकून घेणं सुरूच होतं. त्याचबरोबर माझंही शिक्षण सुरू होतं. 'शिकवण्याला' फाटा दिला की, 'शिकून घेणं' अधिक सोपं होतं. कवितांच्या भेंड्या हा मुलांनीच शोधलेला प्रयोग. छान जमला. मीही कविता संमेलनाची कल्पना मांडली आणि कविसंमेलन यशस्वी करून मुलांनी आनंदावर कळस चढवला. तो आनंद अवर्णनीयच होता. एका नव्याने धडपडणाऱ्या शिक्षकाच्या दृष्टीने तरी...

* * *

नकाशाशिवाय भूगोल कसला? भिंतीला नकाशा टांगून नकाशावाचन चुकीचं होतं. म्हणूनच दिशा निश्चित करून नकाशा जमिनीवर अंथरला. दिशा, भूमी, समुद्र इ. बाबी नकाशाच्या साह्याने माहीत करून घेतल्या. गटपद्धतीने वर्गांची रचना करून गटनायक नेमले. पाठांवर वेगवेगळे प्रश्न बनवायला लावले.

गटातील मुलं शांत राहतच नव्हती. मग 'आदर्श गटाची कल्पना' मुलांना पटवून दिली. जो गट अधिक प्रगती करेल त्यालाच बक्षीस मिळेल. ती लालूच होती खरी; पण त्यामुळे गटागटात जिद्द निर्माण झाली. काही मुलं अभ्यासात मागेच राहत होती. त्यांच्यासाठी अधिक वेळ द्यावा लागत होता. गटपद्धत व गटनायक पद्धतीमुळे भूगोलासारखा नावडता विषयही आवडता बनला. ही या हसत-खेळत शिकण्याची यशस्वी सुरूवात होती.

* * *

मुलांना गोष्टी आवडतात. गिजूभाई बधेका यांच्या मते तर गोष्टीतूनच मुलांना सर्व शिक्षण द्यावं. शिक्षण आणि आनंद या दोन्ही गोष्टींची आपण फारकत केली आहे. खेळत-खेळत शिकता येतं, याची आपणास जाणीव असायला हवी. 'गोष्ट' जर मनुष्याला आनंद देणारी स्वयंसिद्ध वस्तू (साधन) आहे, तर तिला शिक्षणात अनिवार्य स्थान मिळणे आवश्यकच आहे. सर्वच विषयांच्याबाबतीत हे तत्त्व जरी वापरता येत नसलं तरी इतिहासासारख्या विषयांत याचा भरपूर वापर करता येईल, हे जाणून मी गोष्टीरूपात इतिहास शिकवायला सुरूवात केली होती.

मुलांसाठी एकदम नागरी वळणाची भाषा किंवा कठीण शब्दांचा वापर हानिकारक ठरतो. दुसरं म्हणजे ते त्यातून आनंद घेऊ शकत नाहीत. कठीण भाषेचं अपचन तर होईलच. अशाप्रकारे दोन्ही बाजूंनी मुलांचे भाषेचे नुकसानच होईल, याचंही भान ठेवलं पाहिजे. तरीही जास्तीचा भर हा प्रश्नोत्तरांच्या पाठांतरावरच द्यावा लागला. कारण पुन:पुन्हा तपासणी घेणारे अधिकारी डोळ्यांसमोर येत होते. इतिहासातील पाठांवर आम्ही छोटी-छोटी नाटुकली बसवली.

* * *

सहकारी शिक्षकांनाही आता माझी पद्धत आवडू लागली होती. त्यांच्याही अनेक गोष्टी मला पाहायला व शिकायला मिळाल्या. उदा. मैदानावरच खेळत-खेळत विषम संख्यांच्या जोड्या तयार करणं. तळ्यात मळ्यात खेळता खेळता मूळ-संयुक्त संख्या जाणणे, हे अगदी धम्माल खेळ होते. तोंडीच उदाहरणं सोडवणं. या पद्धती लिहून काढल्या व त्यांचा वापर सुरू केला. विशेष म्हणजे हे सर्व सहजच जमून गेलं.

* * *

एके दिवशी ऑफिसमध्ये सर्व शिक्षक वर्ग बसलेला होता. आमचे एक धडपडे सहकारी शिक्षक मित्र उभारले व म्हणाले - "आपल्या शाळेचं काटेरी तारेचं कुंपण दुरुस्त करून घ्यावं, असं खूप दिवस झालं मनात आहे. गावकरी तार व रंग द्यायला तयार आहेत. मेहनत मात्र आपल्याला करावी लागेल."

"सर, मी तयार आहे. काम कधी सुरू करायचं तेवढं सांगा." माझ्या या उत्साही बोलण्याने त्यांचाही उत्साह वाढला. आम्ही चौघंही उत्साहाने कामाला लागलो. मुख्याध्यापकांनीही आमच्याबरोबरीने काम केले.

एका प्रकारची धामधूमच सुरू झाली. तारा आणणे, त्या ताणून घेणे, पडलेले लोखंडी खांब उभे करून सिमेंट वाळूने पक्के करणे हे काम जवळ-जवळ आठवडा - दीड आठवडा सुरू होते. मी आणि मित्राने खांब रंगवण्याचं काम घेतलं.

मुख्याध्यापक व आम्ही प्रवेशद्वाराचे खांब स्वत: बांधायला घेतले. मुलांनी गटागटाने

मैदानावरील सर्व खड्डे बुजवले. कुंपणाची रंगरंगोटी झाली. प्रवेशद्वार बसवलं. पहिल्या दिवशी वादळात आडवं झाल्यासारखं वाटणारं कुंपण आता सजून हसून सर्वांचे स्वागत करत होतं.

वृक्षारोपणाचा कार्यक्रमही पार पडला. झाडांची निगा राहावी यासाठी प्रत्येक मुलाला एक-एक झाड वाटून दिलं. पर्यावरणाचं व श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व पटवून द्यायला वेगळी अशी तासिका घ्यावीच लागली नाही.

भर उन्हात हातात ब्रश घेऊन कुंपणाचे खांब रंगवण्याचा अनुभव जाता जाता शिदोरीत जमा झाला. शाळा रंगविण्याचाही अनुभव सहजच मिळाला. शिकण्याचा हा नवा धडाही हसत-खेळत शिक्षणाचाच एक भाग झाला.

* * *

वर्षभराचं शिक्षण हसण्या-खेळण्यात रंगून जावं याची पूर्वतयारी माझ्याच शिक्षणात होत होती. आनंदाच्या पलीकडचं शिक्षण घेण्या आणि देण्यासाठीही!

◆

ती नदी
ती शाळा

ती देते
ती घेते
ती प्रेम भरते
कधी कधी रागावते
स्वत:ला समजावते
आणि
तुम्हालाही
ती अगदी स्वतंत्र असते...
खळाळते
तिचं स्वातंत्र्य
आणि तिचा प्रवास
या तिच्या जिवंतपणाच्या
खुणा..
नदीकडून आपण शिकायचं
देणं आणि घेणं
प्रेम करणं आणि रागावणं
पण, विसरायचं कधीच नाही
जिवंत असणं आणि खळाळणं
स्वतंत्र असणं आणि
प्रवास करणं....

**- लीलाताई पाटील**

प्रकरण ७

# त्यांचा आवाज गोड आहे...

वाचनाने व्यक्ती स्वत:मध्ये डोकावू शकते. कल्पकतेच्या नवनव्या वाटा गवसतात; परंतु एखादी गोष्ट केवळ वाचून चालत नाही, तर तिचा कल्पकतेने वापर करता आला पाहिजे. आहे तसं न घेता आपल्या कल्पकतेच्या कसोटीवर पारखूनच, स्वत:च्या कौशल्याचा वापर करून त्यात आणखी नावीन्य आणणं हाही एक वेगळाच प्रयोग म्हणायला हवा. ती कौशल्ये दृश्य असोत अथवा नसोत; मात्र समोर बसलेल्या त्या लहान मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद खूप काही सांगून जातो. तीच आपल्या कौशल्यांची खरीखुरी पोचपावती म्हणायला हवी.

माझंही अगदी तसंच झालं. शाळेत असलेला टेपरेकॉर्डर पाढ्यांच्या सरावासाठी वापरला होता; पण त्याचा नव्या स्टाईलने वापर करता येऊ शकतो, हे त्या लेखाने मला शिकवलं एका मासिकात मी तो वाचला होता. नावीन्याचा शोध म्हणून तो खेळ छानच होता. त्यात आणखी नाविन्य आणता आलं तर पाहावं, असं वाटायला लागलं. मनात नाना विचार घोळू लागले. अभ्यास आणि रंजन यांचा ताळमेळ साधण्याची धडपड शांत बसू देईना. अखेर एक ढाचा तयार झाला आणि प्रात्यक्षिकाचा दिवस ठरला.

मुलं छान गातात. छान बोलतात; पण आजवर त्याकडे कधी लक्षच दिलं नव्हतं. त्यांनी तंतोतंतच गावं, हा माझा अट्टहास. मला त्यांचा गोड गळा ऐकूच देत नव्हता. त्यांना सहज सुचणारे रंगबिरंगी विनोद-विनोदी पुस्तकांच्याही पुढचे असतात. याचा मात्र आपल्या कणभरही विचार मनाला शिवत नाही. कुणी छानशी कविता गातं, कुणी कथा सांगतं, कुणी विनोद! या सगळ्यांचाच जर संग्रह केला तर? रोज रोज कॅसेटातील गाणी-कविता ऐकवण्यापेक्षा मुलांना त्यांनीच गायलेली गीतं, त्यांनीच सांगितलेली कथा ऐकवली, तर किती धम्माल येईल! व्वा! कल्पना तर सुंदर आहे. पक्क ठरवलं की, हा उपक्रम राबवायचा म्हणजे राबवायचाच.

दुसऱ्या दिवशी सकाळची प्रार्थना, परिपाठ झाला आणि मुलं आपापल्या वर्गात जाऊन

बसली. हजेरीचा कार्यक्रम उरकल्यानंतर रंगीत तालीम म्हणून काही मुलांना कथा, कविता-गीते म्हणायला लावली. अगदी तन्मयतेने तिने गायलेली कविता ऐकून माझी समाधीच लागली. तिने गातच राहावे, असं वाटलं. आपल्या वर्गात एवढं सुंदर गाणारी मुलगी आहे, हा माझ्यासाठी तर साक्षात्कार होता. केवळ खेकसूनच कविता गायला लावणारा मी ... या मुलांना समजूनच घेऊ शकलो नव्हतो. मुलं अगदी जीवावर आल्यासारखीच कविता-गीतं गायची-म्हणायची. ते गाणं नसायचंच, ते असायचं केवळ घाबरणं.

मुलांनी आज मोकळ्या मनाने व गळ्याने गायलेली कविता मला एक नवा धडा शिकवून गेली. धाकात मनं फुलत नाहीत. उलट कोमेजतात आणि मोकळ्या वातावरणात झपाट्याने वाढून डुलायला लागतात. अडवलेल्या पाण्याचं शेवाळलेलं रूप आणि मुक्तपणे वाहणाऱ्या झऱ्याचं पारदर्शी रूप यात जेवढा फरक तेवढाच धाकात आणि मोकळ्या वातावरणात आहे.

माझ्यातल्या कडक गुरुजींत ही जाणीव पक्की भिनलीय की, ही मुलं तुझे गुलाम नाहीत. तू शिक्षक म्हणजेच त्यांचा जवळचा दोस्त! वागतोस तू त्यांच्याशी तसा? प्रश्न तर होतेच; पण उत्तरं मला शोधायची होती.

मी वर्गातील सर्व मुलांना काही ना काही म्हणायला लावलं, मुलंही न घाबरता मी सांगू, मी बोलूचा सपाटा लावत होती. वर्ग बोलत होता. जिवंतपणाच्या खुणा जपत होता.

* * *

जेवणाच्या सुट्टीनंतर मी टेपरेकॉर्डर घेऊनच वर्गात गेलो. मुलं पाहून खूश! या आनंदाच्या भरातच ते चुळबूळ करू लागले. गोंधळ वाढला तसा माझा रागही "कितीदा सांगायचं रे..." मी मोठ्याने ओरडलो आणि एकदम शांत झालो. चूक उमगली. म्हणून वेळीच जीभेला आवर घातला, टेपरेकॉर्डर सुरू केला आणि पहिल्यांदा लतादीदींचं 'वंदेमातरम' हे गीत ऐकवलं.

मुलं सावरून बसली. गोंधळ चूपचाप झाला. सगळ्यांचे कान गाण्याकडेच! मी ओरडूनही ही शांत राहिली नसती; मात्र एका गीतानं त्यांना चिडीचूप करून टाकलं.



गाणं संपलं. मुलं पुन्हा चुळबूळ करायला लागली. मी कोमलला पुन्हा पुढं बोलावलं.

"हं पाहा आता कोमल आपल्याला सुंदर गीत गाऊन दाखवणार आहे. ऐकायचं ना आपण?"

मुलं ओरडली - "हो!"

"मग थोडावेळ आळीमिळी गुपचिळी हं!"

मुलं समजूतदार असल्यासारखी शांत झाली. मी टेपरेकॉर्डरचं बटन दाबलं. कोमल गायला लागली. वर्ग एकदम शांत होता. मुलांना रेकॉर्डिंगची कल्पना दिली नव्हती. तरीही सगळं व्यवस्थित पार पडलं. कोमलचं गीत संपलं. मुलांनी टाळ्यांचा गजर केला.

"मुलांनो, आवडलं ना गीत!"

"हो पुन्हा एकदा ऐकायचं का?"

"हो सर, वन्स मोअर!"

मुलांनी कोमलला पुढं जाण्यासाठी सांगितलं. मी पटकन कॅसेटची रीळ मागं घेतली आणि टेपरेकॉर्डर सुरू केलं. कोमलचा स्पष्ट आवाज वर्गभर घुमला.

पुढं येणारी कोमल जाग्यावरच थबकली. मुलंही इकडे तिकडे कावरी-बावरी होऊन पाहायला लागली. कोमल तर गात नाही, मग गातंय कोण? पुन्हा सर्वांचं लक्ष टेपरेकॉर्डरकडे गेलं. आवाज त्यातूनच येत होता. गाणं संपलं आणि टाळ्यांचा आवाजही झाला.

वर्ग शांतच! हूं नाही की चूं नाही.

"मुलांनो आत्ताचं गीत कुणी गायलं?"

"टेपरेकॉर्डरनं...."

"चूक. आत्ताचं गाणंही कोमलनेच गायलं होतं. मी फक्त ते रेकॉर्ड केलं. म्हणून ते पुन्हा जसंच्या तसं ऐकता आलं."

वाहव्वा! अरे व्वाह ! काय गम्मत आहे! अशा आरोळ्या वर्गभर गरजल्या. प्रत्येक जण उत्सुक होता, माहीत करून घ्यायला की, हे कसं काय झालं? मी सर्व समजावून दिलं. आता प्रत्येक जण टेपरेकॉर्डरची बटणं न्याहाळात होता. कुणी हात लावूनही पाहिलं. बाकी काहीजण खूश होऊन जाग्यावर बसले.

"आता कोण गाणार?"

माझा प्रश्न अजून पडतोय ना पडतोय तोवर साऱ्या वर्गाचाच आवाज माझ्या कानावर येऊन पडला.

"सर मी म्हणतो, सर मी म्हणते.."

गोंधळ वाढला. मी त्यांना हातानेच शांत राहायला सांगितलं.

वर्ग पुन्हा शांत झाला.

मी एकेकाला बोलावून कविता-गाणी, संवाद, प्राणी-पक्ष्यांचे आवाज काढायला सांगितले. ज्याने त्याने आपली कला सादर केली. टाळ्या मात्र टाळल्या. शेवटी एकदाच टाळ्यांचा

कडकडाट रेकॉर्ड करायचा असं ठरलं. काही जणांची ही वाक्येही रेकॉर्ड झाली.

"सर मला नाही येत."

"अय्या, मला लाजच वाटते. मी नाही म्हणणार."

"सर, मी काय म्हणू?"

"हा हा ही ही"ची बाराखडीही रेकॉर्ड झाली.

मुलांना उत्सुकता होती. आपापलं बोलणं ऐकण्याची. मी सर्व कॅसेट ऐकवली. मुलांचा आनंद वर्गभरून वाहत होता. मी कसा बोलतो, तो कसा गायला यावर जणू चर्चासत्रच सुरू झालं. हे पाहिजेच होतं. निकोप स्पर्धेची बीजं इथंच रुजायला हवीत. नाहीतर मत्सराचा रोग ग्रासून टाकतो.

* * *

कॅसेट मस्तच बनली होती. मी मुख्याध्यापकांना वर्गात बोलावून आणलं. तेही आनंदाने आले.

"आज काहीतरी नवीन दिसतंय"

"हो, आज ना..." सुषमाला पुढचं कुणी बोलूच दिलं नाही.

"ए काही बोलू नकोस. सिक्रेट आहे आपलं"- मुलं ओरडली. मुख्याध्यापकांना कॅसेट ऐकवली. ते लक्षपूर्वक ऐकत होते. विनोदांवर हसत होते. कविता ऐकून व्वाह! म्हणत होते.

कॅसेट संपली, मुख्याध्यापक अजूनही बसूनच होते.

"कशी वाटली कॅसेट?"

मुख्याध्यापकांचे डोळे पाणावले होते ते एकच वाक्य बोलले.

"ह्यांचा आवाज गोऽऽड आहे."

आणि त्यांनी डोळ्यांना रुमाल लावला. मुलंही एकदम गंभीर झाली. वातावरण एकदम आभाळ भरून आल्यासारखं कुंद झालं; परंतु मुख्याध्यापकांनी लगेच वातावरण पालटून

टाकलं. त्यांनी स्वत: काही विनोद सांगून मुलांना पोटभर हसवलं. ते विनोदही आम्ही रेकॉर्ड केले. मुलांनाही ऐकवले. मुलंही खूश झाली.

"मुलांनो आपल्या मुख्याध्यापकांचा आवाज कसा आहे?"

मी हसूनच प्रश्न केला.

"गोऽऽऽ ड!"

सारा वर्ग उत्तरला आणि हसण्याची जणू साथच आली, 'हा हा ही ही'ची बाराखडी जोरात दुमदुमत होती. अगदी गोड गोड आवाजात!

◆

## बदल घडतो...

बदल घडतो...
ऋतू बदलतो तेव्हा बदल घडतो.
चिमण्या चिवचिवतात तेव्हा बदल घडतो
पोर मांडीवर येते तेव्हा बदल घडतो.
कुणाचं कुणावर प्रेम जडतं तेव्हा बदल घडतो.
भूक वाढते, आत्महत्या वाढतात तेव्हा बदल घडतो.
माणूस एकट्याने लढण्याचं ठरवतो तेव्हा बदल घडतो.
आकाशात ढग दाटून येतात तेव्हा बदल घडतो.
डोळे पाहतात, कान ऐकतात तेव्हा बदल घडतो.
एवढंच काय, 'असा विचार येण्यानेही बदल घडतो' की
'काय बदल घडतो'
जिथं माणूस आहे, हवा आहे, प्रकाश आहे, आकाश आहे
अंधार आहे...
डोंगर-नद्या आहेत, समुद्र आहे, शेतं आहेत,
पक्षी आहेत, लोकं आहेत, आवाज आहेत...
घोषणा आहेत....
बदल घडतो...
बदल घडतो म्हणूनच बदल घडवून आणणाऱ्यांसोबत
लोक उभे असतात...
आणि लोक म्हणू लागतात की "होय, बदल घडतो!"

मूळ कविता : **विष्णू नागर**
अनुवाद : **फारुक एस. काझी**

प्रकरण ८

# परीक्षा पास होताना...

विविध उपक्रमांबरोबरच पाठ्यक्रमाचंही शिक्षण चालूच होतं. परीक्षांच्या दृष्टीने त्याचंही महत्त्व होतंच. नियोजनानुसार नसलं तरी थोड्याफार पिछाडीने का होईना, अभ्यासक्रम पूर्ण होण्याच्या मार्गावर होता. दिवाळीची सुट्टी जवळ होती. तशी परीक्षेची भीती वाढू लागली.

मुख्याध्यापकांना वर्गाची तयारी आजमावून पाहण्याची विनंती केली. 'तयारी चांगली', असा शेरा मिळेलच, याची खात्री नव्हती; परंतु मुख्याध्यापकांनी 'तयारी चांगली' असाच शेरा दिला. आनंद तर वाटलाच; परंतु सोबतच माझं मन राखण्यासाठी तर हा शेरा त्यांनी दिला नाही ना? अशी शंकाही वाटायला लागली. मी ती बोलूनही दाखवली.

"तुमचे प्रयत्न मी पाहिलेत. खरं तर त्यांच्यासामेर 'चांगला' हा शब्दही खुजाच आहे; परंतु कधी कधी ही अतिस्तुती माणसाला आपल्या रस्त्यापासून दूर नेते. म्हणूनच चांगला हा शब्द वापरला. रस्ता भरकटू नये म्हणूनच! मी 'बरा' म्हटलं असतं, तर तुमची सारी उमेद तिथंच संपली असती. एक लक्षात ठेवा, पालवी सहजासहजी फुटत नाही. मोहोर उगीच फुलत नाही. त्यासाठी झाडाला स्वत:ला गळून पडावं लागतं. पानगळीच्या वेदना सोसाव्या लागतात; पण त्या वेदनेतही पालवीचं स्वप्नं फुलत असतं. आतून उमलणारा अंकुर हुंकारत असतो. तो करपला की, पालवीही करपली म्हणून समजा. तो अंकुर तुमच्यातूनही हुंकारतोय. त्याला करपवण्याचा करंटेपणा मी करणार नाही. शिक्षक केवळ 'ऊर्मी' देतो. मीही तेच केलंय. प्रयत्न चालू ठेवा. यश म्हणजे शेवटचा निकाल नव्हे. आपल्या प्रयत्नांचा दर्जा सतत वरचा ठेवणे हेच यश! बाकी सारे व्यर्थ!"

कुठल्या पुस्तकात मिळाले असते असले विचार? कुठं मिळाली असती असली 'ऊर्मी' देणारे हात? मरगळ झटकून मीही जोमाने कामाला लागलो. आतून उमलणं काय असतं, याचा जिवंत अनुभव मी घेत होतो.

उजळणी, स्वाध्याय यांचं सत्रच सुरू झालं. बदल म्हणून नवनवीन खेळ सुरूच होते. अभ्यासाचं ओझं न वाटता तो सहज पचवता यावा यासाठी वेगवेगळे उपाय योजत होतो. परीक्षा जवळ यायला लागल्या होत्या.

एके दिवशी घाबरवून सोडणारी घटना घडली. मागच्या वेळेस शाळेत येऊन गेलेले अधिकारी पुन्हा शाळेत आल्याचं कळालं. भीतीने माझ्या पोटात गोळाच आला.

अधिकारी ऑफिसमध्येच बसले होते. त्यांनी एखादा वर्ग दाखवा, असं सांगितलं. सगळ्याच शिक्षकांचे धाबे दणाणले.

मुख्याध्यापकांनी सगळ्यांकडे एक नजर टाकली आणि पुन्हा ठेवणीतलं हास्य करत म्हणाले -

"साहेब, चौथीचा वर्ग पाहावा."

"पाठीमागे पाहिलाय ना तो वर्ग? मग नको. तयारी काहीच नाही. दुसरा एखादा पाहूया."

साहेबांचा स्वर नाराजीचा होता. माझी तर मानच खाली गेली. "साहेब, एकदा जाऊन वर्ग पाहावा. तयारी कच्ची वाटली, तर वर्गशिक्षक आणखी मेहनत घेतील."

मुख्याध्यापकांच्या विनंतीला मान देत अधिकारी महोदय माझ्या वर्गात आले. स्वागत झाल्यावर त्यांनी काही प्रश्न विचारले. गणितं सांगितली. जवळ-जवळ अर्ध्याहून अधिक वर्ग चांगला प्रतिसाद देत होता. मागं राहणारी मुलंही धडपड करत होती. "अजून काय येतं?" असं अधिकारी महोदयांनी विचारताच मुला-मुलींच्या एका गटाने छोटसं नाटुकलं करून दाखवलं. कविता सुस्वरात गाऊन दाखवल्या.

अधिकारी महोदयांच्या चेहऱ्यावर काहीच प्रतिक्रिया उमटत नव्हती. अंदाज बांधणं कठीण होतं. गुणाकार झाला; मात्र भागाकारात मुलांनी चुका केल्या. मी घाबरून मुख्याध्यापकांकडे पाहिलं. त्यांनी हलकं स्मित केलं. माझ्याकडे असं पाहिलं जणू मला ते आश्वस्त करत होते -

"घाबरू नका. सगळं काही व्यवस्थित आहे."

अधिकारी महोदय गेले. मला वर्गाविषयीची प्रतिक्रिया ऐकायची होती. मी धावत ऑफिसात गेलो. मुख्याध्यापक खूश दिसत होते. मी जाताच त्यांनी शेरेबुक माझ्यासमोर ठेवलं.

''चौथीच्या वर्गाची तयारी 'अधिक चांगली' दिसून आली. गुणाकार भागाकाराचा सराव द्यावा.''

मी तर हरकूनच गेलो. 'अधिक चांगलं' या शब्दाचं नवीन मेडल मिळालं होतं.

''पाहा सर, तुमचा वर्ग नुसताच चांगला नाहीतर 'अधिक चांगला' आहे. आता तर खात्री पटली ना? प्रयत्न थांबवू नका. एवढं मात्र खरं. मुलं परीक्षेआधीच परीक्षा पास झालीत.''

''होय सर, त्यांच्याबरोबर आज मीही पास झालोय. हा अंतिम निकाल नाही. ही माझ्या प्रयत्नांना मिळालेली शाबासकीची थाप आहे.''

मी खुशीतच ऑफिसच्या बाहेर पडलो.

* * *

परीक्षा सुरू झाल्या. पेपर सोडवताना खूप टेन्शनमध्ये होती मुलं. पेपर संपताच मात्र रिलॅक्स होत होती. आपण मात्र अशावेळी मनामनाचं ओझं घेऊन चालत आहोत, असा आव आणतो. मुलांच्या प्रगतीपेक्षा आपण किती चांगली तयारी करून घेतलीय, याचंच प्रदर्शन करण्याची सुप्त इच्छा प्रत्येकाच्या मनात असतेच असते.

काही मुलांच्या चेहऱ्यावर तरळणारं तेज डोळ्यांत भरून घेत मी वर्गावर्गातून फिरत होतो. ''सर तुम्ही चिंता करू नका. आम्ही सगळं निभावून नेऊ.'' असा मजेदार दिलासाच जणू प्रत्येक जण मला देत होता. सर्वच्या सर्व पेपर संपले. एखादा सोडता इतर सर्व पेपर तसे सोप्पेच गेले होते. हसऱ्या चांदण्याचं वलय प्रत्येक चेहऱ्यावर विलसत होतं. नावडती का असेना; पण परीक्षा दिल्याचं समाधान लपता लपत नव्हतं.

* * *

परीक्षांच्या भीतीने मुलांना कुठंवर दडपलं जाणार आहे, कुणास ठाऊक? कुणीतरी

प्रश्नाचा फेर धरायचा आणि आपल्याला अपेक्षितच उत्तर मुलांकडून घ्यायचं, जो अपेक्षित लिहितो तोच हुशार हा आमचा गैरसमज.

ताराबाई मोडक नेहमी म्हणायच्या - आदिवासी भागातील मुलं लेखन-वाचन प्रमाणभाषा, यांपासून खूप दूर असतील; मात्र जंगलातल्या सगळ्या पायवाटा, झाडं-वेली, फुलं-फळं यांची त्यांना तंतोतंत माहिती सांगता येते. झाडावर चढणे, पोहणे, धावणे यात ते मात खात नाहीत; पण दुर्दैव हेच की, आपल्या चाकोरीतल्या शिक्षणाला ह्या कलाकौशल्यांशी फारसे सोयरसुतक नसते. धावता येणाऱ्या सशाला पोहता येत नाही म्हणून शेरा मारणारी ही शिक्षण पद्धती!

गुरूदेव रवींद्रनाथांनी एका लेखात लिहिलंय की, घोकंपट्टीवर आधारित पद्धती डिग्री मिळविण्यासाठी भलेही सहायक असेल; पण उंबरठा ओलांडून जीवनात, आमच्या आत ती प्रवेश करू शकत नाही.

* * *

एक परीक्षा पार पडली. मुलांची आणि माझीही. सुट्टी समोर होती. मुलांच्या सुट्टीचा आनंद कमी होऊ नये यासाठी काहीतरी करणं भाग होतं; परंतु परीक्षा पास होण्याचा आनंद उपभोगूनच पुढचं मार्गक्रमण! समाधानाचं हसरं चांदणं सोबत घेऊन.

◆

''मुलांमध्ये कुठलाही गुण ठळकपणे
दिसला नाही तरी तू आमच्यासाठी, या समाजासाठी
एक 'बहुमूल्य व्यक्ती' आहेस, हा संदेश प्रांजळपणे
मुलांपर्यंत पोहोचलाच पाहिजे.''

**-नीता ताटके**
(चतुरंग, विकार ते स्वीकार)

प्रकरण ९

# रंग रंगीला रंगमंच...

दिवाळीची सुट्टी संपली. आता पुन्हा एकदा वेध लागले ते शाळेचे. आमच्या वर्गाचे, आनंदवनचे! मुलांचा निकाल तयार होता. फार मोठ्या चमत्काराची अपेक्षा नव्हतीच; मात्र तरीही मुलांचे पेपर पाहताना समाधान वाटत होतं. माझ्या शिकवण्याचं नव्हेतर त्यांच्या शिकण्याचं, मेहनतीचं फळ होतं. प्रयत्नांचं सार्थक झाल्यासारखं वाटलं.

दिवाळी सुट्टीनंतरचा पहिलाच दिवस. सर्व सहकाऱ्यांशी भेट. वर्गातील पाखरांशी भेट. मुख्याध्यापकांनी सर्वांचे हसून स्वागत केले.

''येणाऱ्या नवीन वर्षाच्या व नवनवीन उपक्रमांसाठी माझ्या हार्दिक शुभकामना.''

मला भरूनच आलं होतं. माझ्या प्रत्येक प्रयत्नाला, उपक्रमांना आधार देत खंबीरपणाने पाठीशी उभारणारे आमचे मुख्याध्यापक मला कधी कधी माझ्या प्रार्थना ऐकणारे व त्या पूर्ण करणारे देवदूतच भासतात. सहकाऱ्यांशी सुट्टीतील घटनांची चर्चा झाली आणि जो तो आपापल्या वर्गाकडे वळला. निकाल द्यायचा होता.

माझ्या वर्गातील उपस्थिती तशी बरीच होती. सुट्टीनंतर शाळेला येणं याहून कंटाळवाणं काम ते कोणतं असणार? तरीही बरीचशी मुलं हजर होती. निकालाची उत्सुकता सर्वांच्याच डोळ्यांत होती. सोबत होती 'आनंदवनची' ओढही.

* * *

डिसेंबर महिना मध्यावर आला. जानेवारीमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त काहीतरी नवीन कार्यक्रम घ्यावा, अशी सूचना मुख्याध्यापकांनी मांडली. मी सर्वांत आधी या प्रस्तावाला पाठिंबा घोषित केला; मात्र इतर सहकारी नाराज होते.

''वर्गाची तयारी बुडते, अभ्यासक्रम पूर्ण होत नाही, त्यात वार्षिक तपासणी, अधिकाऱ्यांच्या

भेटी, वार्षिक परीक्षा, नसती नाटकं करायला वेळ आहे कुणाजवळ?'' या आणि अशा अनेक अडचणी, अनेक निमित्त सांगून 'सांस्कृतिक कार्यक्रमाला' अप्रत्यक्षरित्या विरोधच दर्शविला. मलाही राहावलं नाही.

''सर, मुलं तयारी करू शकतात. त्यांना फार काही शिकवावं लागत नाही. उलट ते जे सहजतेने करतील तेच लोकांना जास्त भावेल, लहान मुलाने गायिलेले एखादे बडबडगीतही प्रेक्षकाचं मन जिंकून जातं. वर्गात घेतलेले कार्यक्रमच आपण रंगमंचावर घेऊ. त्यात पुस्तकातल्या कविता आणि नाटुकलीही असू शकतील. केवळ निमित्त सांगत राहण्याने आम्ही नवीन काहीच निर्माण करू शकणार नाही. त्याच त्या चाकोरीत अडकून पडू. नवीन वाट पाडायला सर्वांचं सहकार्य हवंच ! बोला कितीजण तयार आहेत?''

आश्चर्यच घडलं! सगळे सहकारी एकदम राजी. शाळेत पूर्वी स्नेहसंमेलन व्हायचं; परंतु कालौघात सारं काही बंद झालं. एकंदरीत शिक्षणाचा प्रवाहच मूळचं पात्र बदलून वाहू लागला होता. आमच्या शाळेची हरवलेली परंपरा पुन्हा एकदा जिवंत करण्याचं काम आम्हाला करायचं होतं.

''जुनी परंपरा नव्याने सुरू करताय, आनंद आहे. मला खात्रीय तुम्ही यात जरूर यशस्वी व्हाल''-मुख्याध्यापकांच्या शब्दांनी उरली सुरली कसरही भरून काढली. मी एवढंसं बोललो आणि शिक्षकही तयार झाले! हा माझ्यासाठी चौंका देनेवाला अनुभव होता. आता प्रतिक्षा होती ती 'रंग रंगिल्या रंगमंचाची!''

* * *

आपल्या शाळेत कार्यक्रम होणार, याची कुणकुण मुलांना एव्हाना लागलीच होती. मीही वर्गात सूचना द्यायचं ठरवलं.

''मुलांनो, आपण आपल्या शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम घेणार आहोत. थोडीफार तयारी करावीच लागणार आहे. तुम्ही तयार आहात का?''

''होऽऽऽ'' बिनविरोध ठराव संमत झाला.

"पण, मेहनत घ्यावी लागेल. तयारी करावी लागेल"

"चालेऽऽऽऽऽल."

वर्गात घेतलेल्या नाटुकल्यांचा, गीतांचा, कवितांचा सराव घेणं गरजेचं होतं. सुट्टीमुळे थोडं विस्मरण झालं होतं. ते पुन्हा नव्याने करवून घेणं, सराव देणं गरजेचं होतं. दोन दिवसांत प्रत्येक वर्गाच्या कार्यक्रमाच्या याद्या मुख्याध्यापकांकडे द्यायच्या होत्या. त्यातून निवड होऊन, अंतिम यादी तयार होणार होती. ज्या-त्या वर्गातून नियोजन, तयारी, सरावाचे वारे वाहू लागले. अभ्यासाबरोबरच संवादाचे-गाण्यांचे आवाज शाळेच्या आवारात फेर धरू लागले होते. झपाटल्यासारखं जो-तो काम करीत होता. अशा सांघिक कामातून मिळणारं समाधान हे, दिल्या जाणाऱ्या-मिळणाऱ्या श्रेयापेक्षाही खूप मोठं असतं असंच जणू वाटत होतं.

कार्यक्रमाच्या याद्या तयार झाल्या. इतर वर्गाच्या तुलनेत माझी यादी थोडी जास्तच होती; मात्र सर्वांना समान संधी म्हणून मी माझे काही कार्यक्रम रद्द केले. काही कॅसेट डान्सचाही त्यात समावेश करण्यात आला. उत्साह उदंड होता आणि वेळ थोडा. मुख्याध्यापकांनी कार्यक्रमाचं आयोजन, वेळ, सूत्रसंचालन इ. बाबींचं नियोजन करवून घेतलं. एखादा कार्यक्रम घेताना कोणती काळजी घ्यावी, यासाठी भारंभार पुस्तके वाचण्यापेक्षा असा एखादा अनुभव खूप काही शिकवून जातो. मलाही तोच अनुभव आला. जिवंत सहजशिक्षण याहून वेगळं असतं का?

* * *

तयारी पूर्ण होत आली. सगळ्याच कार्यक्रमांची तयारी जबरदस्त झाली असं नाही; परंतु नव्याने फारसं काही करावं लागलं नाही. आजवर जे वर्गात सादर केलं तेच रंगमंचावर करायचं होतं. गावातील व्यक्तींकडूनही उत्साह वाढवणारे अभिप्राय येत होते. त्यांनाही कार्यक्रम पाहण्याची उत्कंठा लागून राहिली होती.

कार्यक्रमाचा दिवस ठरला. वेळ ठरली. २६ जानेवारी रात्री ठीक ८.०० वाजता..

प्राथमिक शाळांतील कार्यक्रम रात्री फारसे कधीच होत नसत. आम्ही तो घ्यायचा ठरवला. एकदा ठरवलं तर माघार घ्यायची कशासाठी? नवीन उपक्रमांना अडचणींचा सामना करावाच लागतो. त्याशिवाय त्यात नावीन्य आहे, हे जगाला आणि स्वत:लाही कळत नाही. म्हणूनच सर्व अडचणींना गृहीत धरून वाट पाहणं सुरू झालं- २६ जानेवारीची!

२६ जानेवारीचा दिवस. प्रजासत्ताक दिन. प्रभात फेरी, घोषणा, ध्वजारोहन, भाषणे या दिवसभराच्या कार्यक्रमांची सांगता होते न होते तोच रात्रीच्या 'सांस्कृतिक कार्यक्रमाच्या' नियोजनाची जबाबदारी आमच्यावर होती. छोटंसं गाव, साधनं कमी, मात्र उत्साहाला पारावार नाही. या उत्साहाचाच वापर करून घ्यावा या हेतूने रंगमंचाची रचना करण्याचं निश्चित केलं. गावातून एकत्रित केलेल्या शालींना जोडून पडदे तयार होतात, काठ्यांची विशिष्ट रचना करून प्रवेशद्वार व बाहेर जाण्याचा दरवाजा बनवून उभारता येतो, याचं शिक्षण तिथंच मिळालं. आम्हाला उभा राहता येईल, अशी एक जागा एका शालीच्या जोरावर बनवता आली. हेही माझ्यासाठी नवीनच होतं.

रात्र वाढू लागली तसा कार्यक्रम रंगात येऊ लागला. लहान-लहान मुलांच्या अभिनयाने सर्वांनाच चकित करून सोडलं. वर्गात गुपचूप मांडी घालून बसणारे पाय रंगमंचावर थिरकताना नव्या विश्वाची सैर करून येत होते. संगीताच्या तालावर डोलणारं शरीर नव्याच अनुभवविश्वात घेऊन जात होतं. प्रेक्षकांची वाहव्वा, बक्षिसी आमच्या उत्साहाचे इमले उंचच-उंच चढवत होती. नकळत आमचेही पाय थिरकत होते.

मुलं रंगमंचावर इतक्या सहजतेने वावरतील, असं मला वाटलंच नव्हतं; परंतु मला नेहमीच काहीतरी नवीन शिकवत राहणाऱ्या मुलांनी ही संधीही सोडली नाही. रंगरंगिल्या रंगमंचावर मुलंही रंग-रंगिली होऊन गेली होती. भोवतालच्या जगाचं भानही त्यांना राहिलं नाही. जे अडखळत होते त्यांना सावरून घेतलं जात होतं.

मुलांनी सादर केलेल्या नाटुकल्यांनी तर टाळ्यांचा गडगडाटच वसूल केला. परिसरातलेच संवाद, परिसरातलीच भाषा किती सुंदर अनुभव देऊ शकते, याचं ते जिवंत उदाहरण होतं. टवटवीत मनाने केवळ एखादं स्मितहास्य जरी केलं तरी लोभसवाणं वाटतं, मग इथं तर अवघं

अभिनयाचं मधुर गोड गळ्याचं संमेलनच भरलं होतं. ते लोभसवाणं तर होतंच; परंतु मनावर गारुड घालणारंही होतं.

सहकारी शिक्षक मित्रांच्या डोळ्यांत एक नवीनच चमक विलसत होती. प्रत्येक गाण्यानंतर, नाटकानंतर कडाडणाऱ्या टाळ्या मनात खोलवर रुंजी घालत होत्या. जणू काहीतरी नवीन केल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. आपण जे केलं ते योग्यच केलं. परीक्षा, अभ्यास हे सर्व करावंच लागणारं; पण त्यात जिवंत, रसरशीत शिक्षण कुठं आहे? ते आपण मुलांना कधी देणार? अशा कार्यक्रमांतूनच अशा जिवंत व रसरशीत अनुभवातून शिक्षण द्यायला हवं. माझे सर्व अंदाज खरे ठरले, याची खात्री पटली, जेव्हा शिक्षकांनी त्यांची मनं माझ्याजवळ मोकळी केली.

* * *

कार्यक्रम पार पडला आणि प्रत्येकाच्या मनात, शरीरात उत्साहाचे कारंजे थुईथुई नाचू लागले. गाव आणि शाळा जवळ आले. सहकारी मित्रही आता वर्गात नवनवीन उपक्रम घ्यायला उत्सुक होते. चर्चेतून काही उपक्रम शोधता येतील? प्रयत्न करायला काय हरकत आहे, असं ठरवून मी प्रस्ताव मांडला आणि तो बिनविरोध मंजूरही झाला. शिकणं आनंददायी करता येईल का? या माझ्या प्रयत्नांना नवीन जोड मिळाली. एखादा कार्यक्रम एवढं मोठं परिवर्तन घडवू शकतो? मला वाटतं यावर विश्वास ठेवावाच लागेल. निदान मला तरी.

मुख्याध्यापकांनी सर्वच योजनांना मान्यता देऊन टाकली. आम्ही जे करू इच्छितो त्याला १००% पाठिंबाच देऊन टाकला.

"सर, तुमच्या रंगरंगिल्या रंगमंचाने सगळ्यांच्याच मनात रंग भरले. आता हे रंग कायम राहावेत, टिकावेत यासाठीही काही प्रयत्न करायला हवेत. प्रत्येकाला आता कळलंय की, शिक्षण अणि आनंद वेगळं करून चालणार नाही. तुमच्यासमोर बसलेल्या रोपट्यांना सर्व अंगांनी फुलवणं हेच तुमचं कर्तव्य. हेही आता प्रत्येकाला पटू लागलंय. आता थांबू नका. या सर्वांना घेऊनच आपल्याला पुढे जायचं आहे. प्रयत्नांचा दर्जा उंचवायचा आहे."

मुख्याध्यापकांनी तळमळ व्यक्त केली.

"सर, आपल्या सर्वांच्या सहकार्यानेच कार्यक्रम यशस्वी झालाय. तुमचं मार्गदर्शन असेल, तर आपण नवीन उपक्रमांचा खजिनाच उघडूयात. कुणीही कोरा राहणार नाही. मलाही तुम्हा सर्वांच्या अनुभवातून खूप काही शिकायला मिळेल. शेवटी प्रत्येक जण विद्यार्थीच असतो. मलाही अखेरपर्यंत विद्यार्थीच होऊन राहणं आवडेल."

मुख्याध्यापकांनी हुंकार भरून माझ्या पाठीवर थाप मारली. रंग-रंगिल्या रंगमंचाने एवढा मोठा चमत्कार केला आणि माझे हात आणि मन अधिक बळकट झाले. आता मी आणि माझे उपक्रम एकटे नव्हते. अनेक मित्रांचं सहकार्य आणि जोड त्यांना लाभणार होती आणि मुख्याध्यापकांसारखा दिशादर्शक! अजून काय हवं?

◆

## जीवनाचे अंकुर...

‘आपली मुलं’ ही ‘आपली’ मुलं नाहीतच..
ही जीवनाचीच जीवनेच्छा अंकुरली आहे..
ती आली आहेत या जगात आपल्यामार्फत
पण आपण त्याचे उगमस्थान नाही..
ती राहतात खरी आपल्याजवळ
पण, नसतात आपल्या मालकीची...
आपण देऊया त्यांना निरपेक्ष प्रेम...
पण नकोत आपले विचार त्यांच्यावर लादायला..
त्यांना आहेत ना त्यांचे स्वत:चे विचार..
आपण आपल्या घरात सांभाळू त्यांचे देह
पण, त्यांचे आत्मे राहतात
ते भविष्याच्या घरात
तिथं जाणं आपल्याला शक्य नाही...
अगदी स्वप्नातही नाही
आपण त्यांच्यासारखं होण्याचा
प्रयत्न जरूर करावा
पण, त्यांना आपल्यासारखं घडवण्याचा
ध्यास नको
कारण जीवनौघ कधी उलटा मागे वाहत नाही
अन् भूतकाळातही रेंगाळत नाही
आपण केवळ एक धनुष्य आहोत
ज्यातून हे चैतन्याचे बाण
सुटतात उद्याच्या दिशेने...

तो धनुर्धारी दोरी ताणेल तेव्हा
आपण फक्त आनंदानं वाकायचं...
बस्स ! इतकंच!

**- खलील जिब्रान**
(अनु. हेमलता होनवाड)

प्रकरण १०

# खेळ खेळ खेळाचा...

रंगरंगिल्या रंगमंचाने केलेली कमाल कार्यक्रमानंतरही कायम होती. मुलांचा उत्साह कारंज्यासारखा थुईथुई नाचत होता. अभ्यासही योग्य गतीने सुरू होता; परंतु राहून-राहून वाटायचं की, अभ्यासाबरोबरच खेळही हवा आहे; परंतु वर्गावर्गाच्या स्वतंत्र तासिकांखेरीज वेगळं असं काहीच घडत नव्हतं. वार्षिक परीक्षेच्या दृष्टीने सर्वांचीच तयारी सुरू होती. माझं मन मात्र काही केल्या शांत बसेना.

ऑफिसात मधल्या सुट्टीत गप्पा रंगात आल्या होत्या. सांस्कृतिक कार्यक्रमाचा विषय अजूनही ताजा होता. सर्व शिक्षक पुन: पुन्हा खुलून येत होते. वेळ चांगली होती. मी विषय काढायचं ठरवलं.

''मित्रहो, एक बोलायचं होतं. आपल्या सर्वांची परवानगी असेल तर बोलतो.''

सर्व शिक्षक माझ्याकडे पाहू लागले. मुख्याध्यापकांच्या चेहऱ्यावर मंद हास्य होते.

''आपण सांस्कृतिक कार्यक्रम घेतला. त्याने निर्माण झालेलं चैतन्य आपण आजही अनुभवतोय. वार्षिक परीक्षा जवळ येत आहे. तरीही अभ्यासाबरोबर थोडेसे खेळ घेतले, तर मुलांना अभ्यासाचा ताण जाणवणारही नाही.''

उलट-सुलट चर्चा होऊन अखेर खेळाविषयीचा उपक्रम निश्चित झाला. त्याचं सविस्तर नियोजन सर्वांनी मिळून ठरवलं.

- प्रथम प्रत्येक वर्गातील कुशल खेळाडू निवडायला हवेत.
- प्रत्येक वर्गाचे कबड्डी, खो-खो, क्रिकेट इ.चे संघ तयार करायला हवेत. जोडवर्गाचे संघ केल्यावरही मजा येईल.
- वर्गावर्गातील टीममध्ये सामने आयोजित करणे.

▸ विजेत्या वर्गास बक्षीस देणे.

सर्व शिक्षकांनी सहमती दर्शवली; मात्र तरीही त्यांच्या चेहऱ्यावर वार्षिक परीक्षा, अभ्यासक्रम यांविषयी काळजी स्पष्ट दिसत होती.

खेळाच्या तासाला वर्गावर्गाची तयारी सुरू झाली. अभ्यासाबरोबरच खेळाचंही वारं वाहू लागलं. क्रीडा स्पर्धा घेण्याचीही वेळ होती की, नव्हती हे ठाऊक नव्हतं; मात्र त्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होता.

शुक्रवारचा शेवटचा आठवडा. स्पर्धेसाठीचं वातावरण तयार झालं. सकाळच्या सत्रात एकदाच्या स्पर्धा सुरू झाल्या.

स्पर्धा रंगू लागल्या. पालकांचाही सहभाग थक्क करून सोडणारा होता. मुलांचा जल्लोष, चित्कार, प्रोत्साहन देताना होणारा प्रचंड आवाज, त्यामुळे शाळेचे वातावरणच दणाणून जात होते. जिथं तिथं चैतन्याची कारंजी उडत होती. एक भारावलेपण वातावरणात भरून राहिलं होतं.

* * *

स्पर्धा संपल्या आणि विजयी संघ जल्लोषात अभ्यासाच्या तयारीला लागला. कबड्डीत आमच्या वर्गाचा संघ अव्वल आला. वर्गाचा आनंद तर वर्गातही मावेना.

अभ्यासाची तयारी सुरू झाली. पाठ्यक्रम संपविण्याची घाई होऊ लागली. मलाही तयारी करून घेणं गरजेचं होतं. उजळणी करवून घेणं महत्त्वाचं होतं.

खेळामुळे आनंद तर मिळतोच मिळतो; परंतु अभ्यासासाठी ते ताजंतवानं राहणं गरजेचं असतं. ते त्यातून सहज मिळून जातं. खेळणे ही मुलांची सहजप्रवृत्ती असते. स्पर्धा याचसाठी की, त्यातून मुलांना स्पर्धेची ओळख व्हावी, जिद्द यावी, आत्मविश्वास वाढावा आणि कठोर परिश्रम करण्याची सवय व्हावी. त्यातूनच 'आतून उमलणं' सहजसाध्य होतं.

"सर, आणखी एक उपक्रम तुम्ही यशस्वी करून दाखवलात, अभिनंदन!"

मुख्याध्यापकांनी अचानक विषय काढला. आम्ही सर्वजण सोबत होतो. मी काहीसा थबकलो. अवघडल्यासारखं वाटलं.

''नाही सर. मी यात कुठंही नाही. शाळेचं कोणतंही काम हे एकट्या दुकट्याच्या हातून शक्य नाही. हे एक 'टीमवर्क' आहे. सगळ्यांच्या अथक प्रयत्नांचं फळ आहे. परीक्षा जवळ असतानाही आपण सर्वांनी माझा प्रस्ताव मान्य केला, हे तुम्हा सर्वांचंच मोठेपण आहे. या यशाचं श्रेय सर्वांना आणि आपल्या सर्व विद्यार्थ्यांना आहे.''

मी थांबलो. सहकारी मित्रही उजळलेल्या चेहऱ्याने माझ्याकडे पाहत होते. मात्र मुख्याध्यापकांचे डोळे मात्र पाणावलेले होते.

* * *

शाळाशाळांतून अनेक खेळ, उपक्रम घेतले जातात. मग ते मैदानी असोत की वर्गातील. प्रत्येक भाषिक खेळांचंही आयोजन केलं जातं; मात्र या उपक्रमांना कधीच लिखित रूप दिलं जात नाही. 'सृजन-आनंद'सारख्या काही शाळा अशा उपक्रमांना दैनंदिनीच्या रूपात लिहून जतन करून ठेवतात. जे पुढील अनेक वर्षांची शिदोरी बनून कामी येतात. उपक्रमांना लिखित रूप देणं गरजेचं आहे. अनेक कल्पक उपक्रम त्यातून बाहेर येतील. सर्वांनाच मार्गदर्शक ठरतील.

यातून शिक्षकांसाठी एक नवीन कल्पना सुचली तीही मी सर्वांसमोर मांडली.

* * *

- आपण वर्गात आणि वर्गाबाहेर घेतो त्या खेळांनाही लिखित रूप द्यायला हवं.
- त्यांचे नियम-अटी यांचा उल्लेख करायला हवा.
- आपल्याला आवश्यक तेथे खेळांत काही बदल सुचवावेसे वाटले, तर तेही सुचवावेत. त्यांचा स्वतंत्र उल्लेख करावा.
- वर्गातील मनोरंजक खेळांनाही लिखित रूप द्यायला हवं.

- मैदानावरील खेळांप्रमाणे वर्गातील भाषिक-गणिती-वैज्ञानिक खेळांनाही महत्त्व आहेच. त्यांची स्वतंत्र विषयनिहाय नोंद करायला हवी.
- या सर्व उपक्रमांचे संकलन करून प्रत्येक वर्गाला त्याची एक प्रत देण्यात यावी. पुस्तिका केवळ मार्गदर्शक असेल, उपक्रम कसा राबवायचा याचं स्वातंत्र्य शिक्षक व विद्यार्थ्यांना असेल.
- 'अपना ग्रुप' (Our group) योजना राबविता येईल. एक-दोन वर्गांनी एकत्र येऊन काही उपक्रम राबविता येतील आणि यशस्वीही करता येतील. उदा. मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी स्पर्धा, इंग्रजीच्या विकासासाठी नवनवीन तंत्र, संगणक शिक्षण इ.
- मुख्याध्यापक निरीक्षकाचं काम पाहतील.
- राबविलेल्या उपक्रमांची नोंद ठेवण्यासाठी 'माझी नोंदवही' ही योजना करून सर्वच उपक्रमांना लिखित रूप देता येईल.
- हे सर्व उपक्रम पुढील वर्षापासून राबविता येतील. त्यासाठी हवं आहे नियोजन आणि थोडा अधिक वेळ.

* * *

माझ्या प्रस्तावावर सर्व शिक्षकांनी सहमती दर्शविली. प्रत्येकाच्या मनात स्वतंत्र कल्पना होत्या. सर्जनशील विचार होते. ते व्यक्त करण्याची संधी मिळायला हवी. स्वतःच्या वर्गात प्रत्येकाला स्वातंत्र्य हवं असतं. त्यातच असे उपक्रम योजता येतील. त्यातूनच विद्यार्थ्यांशी जवळीकता साधता येते. यातच उपक्रमांची यशस्विता लपलेली आहे.

शिक्षकांचा उत्साह अमाप होता. अनेक उपक्रम, खेळ कागदावर उतरू लागले. एक मित्र-मार्गदर्शक म्हणून 'मार्गदर्शिका' उपयोगी पडणार होती. या धडपडीत मला खरं मत हवं होतं ते मला गुरुस्थानी असणाऱ्या मुख्याध्यापकांचं.

* * *

"मुलांच्या भावविश्वाशी एकरूप व्हायच्या संधी शिक्षकाला खूपच कमी मिळतात. शिकवताना शिक्षकाला थोडंसं कडक, शिस्तप्रिय व्हावं लागतं. काही वेळेस शिक्षकाचा स्वभावच मुलांत आणि शिक्षकात दरी निर्माण करतो. मुलांनाही शाळेत प्रेम आणि सुरक्षितता हवी असते. ते मिळालं की, ते खूप खूश असतात. जर नाही मिळालं, तर ते अभ्यासाकडे पाठ फिरवतात.

सर, माझं मत विचाराल, तर तुम्ही सुचवलेले उपक्रम खरोखरच सुंदर आहेत. शाळेची स्वत:ची एक उपक्रमांविषयीची स्वतंत्र मार्गदर्शिका असेल. ती ही इतकी लवचिक की, सर्व स्वातंत्र्य शिक्षक आणि विद्यार्थ्यांना. या मोकळ्या वातावरणात शिक्षक-विद्यार्थ्यांतील नात्याला एक नवा आकार प्राप्त होईल, हे निश्चित! अखेर हे दोन जीव एकमेकांसाठीच तर धडपडत असतात.

शिक्षकांतली ऊर्मी जागवली की, पुन्हा नव्याने सूचना द्याव्या लागत नाहीत. अडचणी आल्या की, मार्ग आपोआप सुचत जातो. तिथं हजार वाटा हात जोडून उभ्या असतात. सर्जनशील शिक्षक योग्य मार्ग निवडण्यात कधीच चूक करीत नाहीत.

आपल्या या उपक्रमाला आपण नाव द्यायला हवं 'खेळ खेळ खेळाचा' हे नाव कसं वाटतं?"

मी नेहमीसारखाच निरुत्तर झालो. कारण 'खेळ खेळ खेळाचाच' नव्हता, तर तो आमच्यातील सृजनशीलतेला साद घालणारा एक प्रेषितच होता.

"तुम्ही जेव्हा काही बोलता, ते माझ्यासाठी अनेक नियम-मार्गदर्शक तत्त्वाहूनही श्रेष्ठ असतं. या उपक्रमात आम्ही सर्वजण यशस्वी होऊ. मलाही नवीन काहीतरी शिकायला मिळेल. आम्ही जिथं थांबू तिथे तुम्ही वाट दाखवायला उभे असाल अशी आशा करतो."

एवढे बोलून मी वर्गाची वाट धरली. माझ्या आतमध्ये जे चैतन्य नाचत होतं, त्याचाच परिणाम म्हणा हवं तर की, मी जमिनीपासून फूटभर उंचीवरून चालत होतो.

इतका आनंदात न्हावून निघालो होतो.

◆

"Everyday I make an effort to go
toward what I don't understand
This wandering lead to the
accidental learning that
continually shapes
my life..."

- yo - yo - ma

प्रकरण ११

# वर्ष संपताना...

वार्षिक परीक्षांचा मोसम सुरू झाला. १०० मार्कांचे पेपर. लेखन जास्त. मुलांना जे काही आकलन झाले नाही ते लिहिताच आले नाही. मुलं सांगत होती- 'अवघड होता!' त्यातल्या त्यात इतिहास घात करणार यावर त्यांचा पक्का विश्वास बसला होता. पेपर मुलं लिहीत होती; परंतु चिंता मला खात होती. मुलांची अवस्था समजत होती. लिखाणात होणाऱ्या चुका त्यांनाही खटकत होत्या. तोंडी परीक्षेमुळं त्यांच्या हजरजबाबी वृत्तीची परीक्षा होणार होती. मुलं त्यात खूश होती.

परीक्षा संपली आणि 'हुश्श!' करत मुलंमुली मोकळी झाली. निकाल काय लागेल, याची चिंता ज्यांना होता, ते माझ्याजवळ आले.

"जे होईल ते हसून स्वीकारा. परीक्षेतील गुण म्हणजे तुम्ही किती हुशार आहात, हे सांगणारं मोजणी यंत्र नाही. तुमच्या हातातील कौशल्य, मनातील अनंत स्वप्नं आणि मेंदूची विचारशक्ती यांचा विकास हीच यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली!"

माझं बोलणं त्यांना कितपत समजलं मला माहीत नाही; परंतु ते थोडे 'निवांत' झाले. इतरांना निकालाशी फारसं सोयरसुतक नसावं, असंच त्यांचं वर्तन होतं. त्यांना पाहिलं की वाटलं - "मुलांनी असंच राहायला हवं. एखाद्या झुळकेसारखं मुक्त, मनमौजी!"

* * *

पेपर (उत्तरपत्रिका) तपासणं सगळ्यात कंटाळवाणं काम. वर्षभर शिकलेलं मुलं पेपरमध्ये ओकणार (तेही तीन तासांत केलय फक्त!) आणि त्यांनी कितपत घेतलंय आणि ओकलंय, हे आपण तपासायचं. या परीक्षा नकोशा वाटल्या तरी टाळता येत नाहीत हेच खरे.

मुलं घरी जातील असा अंदाज होता; मात्र काही अपवाद वगळता इतर सर्व मुलं-मुली

नियमितपणे वर्गात हजर! आता यांचा अभ्यास तर काय घ्यावा? माझ्यासमोर मोठा प्रश्न होता.

* * *

मुख्याध्यापकांशी याविषयी बोलावं असं वाटलं. पुन्हा वाटलं - अशा छोट्या-छोट्या गोष्टींसाठी त्यांना त्रास द्यायला नको. मी गप्पच राहून काहीतरी योजना आखायचं ठरवलं. परंतु राहावलं नाही.

"सर, मुलं अजूनही येताहेत वर्गात. त्यांना घालवून देणं जमेलसं वाटत नाही. त्यांना काहीतरी उद्योग द्यावा, असं वाटतंय; परंतु काय करावं कळेना? त्यांना काय काम द्यावं? काही सांगाल?'

मुख्याध्यापक नेहमीसारखे मंद हसले.

"सर, मुलांना घालवून द्यावं, या मताचा मीही नाही; परंतु मुलांच्या गोंधळात पेपर तपासणे कठीण जाते. म्हणून इतरांनी मुलांना 'येऊ नका' असं सांगितलं असावं.

वर्षभर तुमच्या काही कल्पना प्रत्यक्षात उतरवायच्या राहिल्या असतील, तर त्या पूर्ण करून घ्या. तुम्ही गोष्टींविषयी बोलला होतात. त्याबाबत काही करता आलं तर पाहा. सर्व ती मदत करायला मी तयार आहे. शाळेच्या उपक्रमांच्या यादीत नवा उपक्रम जमा होईल."

मला नेहमीच कोडं पडत आलं आहे की, या माणसाला नेमकं निदान तरी कसं करता येतं. निदानाला अनुसरून योग्य उपचारही कसे सुचविता येतात? यामागे उभा असावा तो त्यांचा अनुभव ! वर्षभर मला जे करता आलं नाही ते करण्याची संधी मला अनायासे मिळाली होती. या उपक्रमाला सहज एक नावही सुचलं - 'मजेदार गोष्टींचा नजराणा'!

**गोष्टींविषयी थोडंसं :**

खरंतर आपल्या भारत देशात कथा, गोष्टी आणि संगीत यांना असामान्य महत्त्व आहे. त्यामुळेच हे संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहेत. गिजुभाई बधेका हेही पक्के गोष्टीवेडे होते.

सर्वच विषय गोष्टीरूपात शिकविता आले तर? याचा गिजुभाईंनी खोलवर विचार केलेला होता. त्यांच्या मते 'आनंदाचं सार्वत्रिक साधन म्हणजेच गोष्टी!' खरं पाहता आनंद



हाच गोष्टींचा मुख्य उद्देश असतो. त्याशिवाय भारतातल्या कानाकोपऱ्यात लोककथांना खूप महत्त्व आहे. अशाच गोष्टी निवडून त्यांच्याद्वारे शिक्षण देता येईल. मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देण्याचं, 'बी' पेरण्याचं काम 'गोष्टीच' करू शकतात.

मुलांना अडणाऱ्या, माहीत नसलेल्या शब्दांची, म्हणींची, वाक्यप्रचारांची उणीव सहजासहजी भरून काढतात. भाषाविकासासाठी याहून वेगळं माध्यम कोणतं असू शकतं? वर्गावर्गातून चालणारं निबंधलेखन हे अधिक रंजक बनविण्यासाठी त्याची पूर्वतयारी म्हणून गोष्टी उपयोगी ठरतात. नवनवीन कल्पनांना जन्म देतात.

पूर्वी कधी इसाप नावाची एक व्यक्ती होऊन गेली. शरीराने कुरूप असणाऱ्या या गुलामाने नितांत सुंदर गोष्टी रचल्या. प्राण्या-पक्ष्यांच्या तोंडी संवाद दिले. त्या कथा आजही तितक्याच लोकप्रिय आहेत. विद्यार्थ्यांच्याही अशाच काही कल्पना असतील, तर त्यांना संधी

देण्यासाठी 'गोष्टींचा' पर्याय महत्त्वाचा ठरतो.

गोष्ट सांगणं ही एक कला आहे. 'गोष्टींचा कथाभाग आणि भाषा दोन्हीही मुलांना स्वत:च्या नजरेने पाहता यावेत आणि समजले पाहिजेत असेच असावेत.'

* * *

वर्गात आता गोष्टींशिवाय दुसरं काही चालेनासं झालं. एका गोष्टीतून दुसरी गोष्ट, दुसऱ्यातून तिसरी गोष्ट, हा क्रम सतत चालू होता. सकाळच्या सत्रात गोष्टीच गोष्टी व दुपारच्या सत्रात सुट्टी.

केवळ आपणच गोष्टी सांगण्यात अर्थ नसतो. मुलांनाही त्यात सहभागी करून घ्यायला हवं. मुलांनाही त्यातली मजा अनुभवायला द्यावी.

* प्रत्येक मुलाने एक गोष्ट सांगायची.

* ग्रंथालयातील पुस्तकातून रोज एक गोष्ट वाचायची.

* वर्तमानपत्रातील गोष्टी वाचायच्या.

मुलं गोष्ट सांगायला राजी नव्हती; परंतु 'मीच गोष्ट सांगायचं बंद करतो' असा सज्जड दम दिल्यावर मात्र मुलं तयार झाली. अडखळत-धडपडत-बालबोध, कधी तात्पर्य असलेल्या, कधी एका वाक्याच्याच, तर कधी अर्धा अर्धा तास चालणाऱ्या गोष्टी मुलं सांगू लागली. त्यात लोककथा अधिक होत्या. याचाच अर्थ असा होता की, मुलं घरी या कथा ऐकत होती. कुणीतरी त्यांना त्या सांगत होतं.

"मुलांनो, तुम्हाला घरी कोण गोष्टी सांगतं?"

माझ्या या प्रश्नावर सगळ्या वर्गाचा उत्तरांचा वर्षाव झाला. २० ते २५ व्यक्तींच्या नावांची यादी तयार झाली... लोप पावत चाललेल्या लोककथा नव्याने मांडता आल्या तर? विचार आला आणि कामाला लागलो...

"मुलांनो, आता आपल्या आजी-आजोबांकडून गोष्टी ऐकायच्या आहेत. त्यासाठी तुम्ही

तुमच्या आजी-आजोबांना शाळेत घेऊन यायचं. आहे कबूल?''

मुलाचं एक वैशिष्ट असतं. सतत नवं काहीतरी करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्याविषयी त्यांना माहिती असो वा नसो, ते जाणून घ्यायला, काहीतरी नवीन करायला हे सतत उत्सुक असतात. त्यातच त्यांचं 'मूलपण' दडलेलं असतं. आजी-आजोबा शाळेत गोष्ट सांगणार, आपण ती ऐकणार यातलं चैतन्यच त्यांना शांत बसू देत नव्हतं.

आजी-आजोबा शाळेत येऊ लागले. कथा-गोष्टी सांगू लागले. काही मुलांची टीम त्या गोष्टी लिहून काढत होती. पाहता पाहता २५ ते ३० कथांचा संग्रह झाला. अर्धवट मुद्दे, प्रसंग पुन्हा दुरूस्त केले. काही कथा रेकॉर्डही केल्या. कथाचं पुनर्लेखन गरजेचं होतं. त्यांचं एक छोट पुस्तक बनवायचं होतं -

कथांचं पुनर्लेखन करून त्या चांगल्या कागदावर उतरवण्यात आल्या. सजावट पूर्ण करून ते कागद शिवून घेतले. सुंदरसं मुखपृष्ठ तयार झालं आणि वर्गाचं स्वतंत्र कथांचं पुस्तक तयार झालं. मुलांच्या हातचं ते पहिलं वहिलं पुस्तक मी मुख्याध्यापकांना दाखवलं

''आपल्या शाळेत आता कथाकारही तयार होऊ लागलेत. आनंद आहे. मोकळ्या वेळेचा इतका सदुपयोग ! सर, मुलांमध्ये ही प्रेरणा जरूर रुजेल अशी आशा वाटते. लोप पावणाऱ्या या कथा आहेत मात्र खूप सुंदर ! तुमची तयारी असेल तर पुढच्यावर्षी आपण आपल्या शाळेचं 'मुलांचं हस्तलिखित' सुरू करू. मुलांना संधी दिल्यावर ते काय करू शकतात, याचं हे जिवंत उदाहरण! असाच प्रयत्न करत राहा. आम्ही सदैव तुम्हाला सहकार्य करायला तयार आहोत.''

* * *

लोककथांचा संग्रह झाला. आता मनात होतं ते गोष्टींना अनुसरून चित्रे काढायची व 'चित्ररूप गोष्टी' तयार करायच्या. यालाही मुलांनी प्रचंड प्रतिसाद दिला. काही गोष्टी निश्चित करून त्यांना अनुसरून कागदावर 'चित्ररूप गोष्टी' उतरू लागल्या. रेषा वाकड्या-तिकड्याच; पण त्यांना जे 'मासुम' हात चितारत होते, त्यातली धमक आणि डोळ्यांतील स्वप्नांचे रंग

यामुळे त्यांना एक अलौकिक सौंदर्य प्राप्त झालं होतं.

काही दिवसांत 'चित्ररूप गोष्टी' तयार झाल्या.

गोष्टींचे लेखन झाल्यावर आता त्या गोष्टींचं वाचन सुरुरू केलं. काही दिवसांपूर्वीच ऐकलेल्या कथा मुलं त्याच स्वरात आवाजातील चढ-उतारासह वाचण्याचा प्रयत्न करीत होती. मला वाटतं, गोष्टीतून भाषाविकास हा जो गिजूभाईंनी मुद्दा मांडला तो इथे बरोबर लागू पडतो. वाचनातील वेग, चढ-उतार या टप्प्यांचा विकास गोष्टींच्याच माध्यमातून झाल्याचे दिसून येते.

* * *

मुलंही आता स्वत:हून गोष्टी सांगण्यासाठी पुढं येत होती. हावभावासह गोष्टी सांगत होती. यात नावीन्य काय? असं काही जणांना वाटणं साहजिकच आहे; परंतु ग्रामीण भागातील वातावरण, संधी, तयारी, उपलब्ध साधनं यांचा विचार करता ही नावीन्याने रसरसलेली संधीच मुलांना वाटत होती. भले त्यांची भाषा 'माध्यम' भाषेसारखी नसेल; मात्र भाव तर तोच असतो. फक्त शब्द बदलतात. आपल्या मातृभाषेतीलच शब्द मुलांना जवळचे वाटतात. तेच शब्द बोलण्यात वापरले जातात. पुस्तकातून वाचलेला एखादा शब्द, वाक्यप्रचारही मुलं सहजपणे वापरतात. भाषा जगणे, तिचा प्रत्यक्ष जीवनात इतका सुंदर वापर करणे हा एक सुंदर अनुभवच असतो!

* * *

मुलांसाठी तयार केलेल्या चित्रांचं प्रदर्शन लावून मुलांना -

* चित्रावरून गोष्ट सांगणे,

* नवीन गोष्ट तयार करणे

असं सुचवलं. फारसा प्रतिसाद मिळाला नाही; परंतु एकदमच एखादी नवीन गोष्ट करायला सांगितल्यावर मुलांची तारांबळ ही उडणारच. हे आधीच गृहीत धरलेलं होतं.

मुलं गोष्टी केवळ समजून घेत होती असं नव्हेतर प्रत्यक्षात जगत होती. ती प्रत्यक्षात पात्रं रंगवत होती. अशा जिवंत गोष्टी वर्गात घडत असतील तर आनंदाचं हे पर्व ... आनंदवनातच... आकाराला का येणार नाही? नाही का?

गोष्टींच्या तात्पर्यावरून आठवलं. राजीव तांबे म्हणतात की, "गोष्टींना तीच ती तात्पर्ये चिकटवण्यापेक्षा मुलांनाच तात्पर्ये शोधायला लावली तर! गोष्टीही कशा खळाळत्या हव्यात. चौकटीतल्या बंदिस्त गोष्टी आणि तात्पर्ये... थांबवूयात!"

* * *

पाहता पाहता महिना संपला आणि सर्वांनाच निकालाचे वेध लागले होते. वर्ष संपलंच होतं. १ मे जवळच होता. मुलांना त्यांच्या शेवटच्या परीक्षेचा निकाल द्यायचा होता. चिंता-आनंद यांचा संमिश्र असा गंध साऱ्या शाळाभर दरवळत होता.

कामाचं ओझं सरल्याचा आनंद तर होताच, सोबतच वर्ष संपल्याचं दु:खही होतं. मुलं त्यांची शेवटची परीक्षा पास होणार होती... त्यांच्या सोबत मीही...!

◆

## जर मी

जर मी...
विश्वातल्या एका हृदयाला
तुटण्यापासून वाचवू शकले
तर मला वाटेल
मी अगदीच व्यर्थ
जीवन जगले नाही
जर मी
कोणा एखाद्याच्या
जीवनाला प्रेम दिले
कोणा एखाद्याच्या दु:खाला
चुचकारू शकले
किंवा कोण्या एका पक्ष्याच्या
घरट्याला सावरू शकले
तर मला वाटेल
मी जीवन व्यर्थच जगले नाही...

**- एमिली डिक्सन**

प्रकरण १२

# शिदोरी

वर्ष संपलं. अगदी नकळत सारं घडून गेलं असं नाही. जाणीवपूर्वक काही गोष्टी करता आल्या. स्वत:ला आजमातून पाहता आलं. मुख्याध्यापक, मित्र यांच्या सहकार्याने हे सर्व साध्य करता आले. मुलांची शैक्षणिक प्रगती कुठवर आली ह्याचा पडताळा घेतला तर दैनंदिन जीवनात उपयोगी पडेल एवढं ज्ञान त्यांनी प्राप्त केल्याचं दिसून येईल. त्यांनी अप्रतिम यश मिळवलं असं मी म्हणणार नाही. कारण, मुलांना मिळणारा परिसर, घरातील वातावरण या ही गोष्टी इथं महत्त्वाच्या ठरतात.

अध्यापन म्हणजे केवळ पाठ्यपुस्तक शिकवणे, प्रश्नोत्तरे घोकून घेणे, पोपट तयार करणे वा एकाच छापाचे विद्यार्थी तयार करणे नव्हे. हे तत्त्व जेव्हा जाणवलं तेव्हाच अध्यापनात मुलांचं प्रत्यक्ष जीवन आणण्याविषयी विचारचक्रं चालू लागली. ते प्रयत्न आजही अव्याहत सुरू आहेत. खरंतर आनंदवन इथेच संपत नाही. संपूही नये कारण यावर्षी ठरवलेले अनेक उपक्रम पुढील अनेक वर्षात राबवता येतील. केवळ ठरवल्याने सर्व साध्य होतंच असं नाही. त्यासाठी प्रत्यक्ष कृती महत्त्वाची. यावर विश्वास ठेवूनच पुढील वाटचाल करणे सुलभ जाते. आणि गेलेही.

या वर्षभराच्या प्रवासातून काही प्रश्न निर्माण झाले ते असे-

- मुलं आपल्याकडून काय अपेक्षितात? यावर आपण कधी विचार केलाय?
- शिक्षक-विद्यार्थी यामधील अदृश्य पाषाणी भिंती पाडण्यात आम्ही यशस्वी होऊ शकू का?
- समोरच्या प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत आपण पोहचतोच का? तसा प्रयत्न तरी करतो का?
- सहज संवादातून मुलांशी आम्ही नातं जोडतो का?

- विद्यार्थ्यांतील उर्जेचा, उर्मींचा वापर करून घेणं आम्हाला खरंच जमतं का?
- आम्ही स्वत:च्या क्षमतांचा तरी पुरेपूर वापर करतो का?
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कोणकोणते प्रयत्न करतो?
- यश मिळो अथवा न मिळो त्यासाठी आम्ही धडपडतो तरी का?
- वर्गातला जिवंतपणा चित्रांनी नव्हेतर सहजसंवाद, हसणं व विना दडपणाच्या वातावरणामुळे येतो. याविषयी आपण आवर्जून कधी विचार केलाय का?
- स्वत:च्या ज्ञानाच्या कक्षा रूंदाव्यात म्हणून आपण अवांतर वाचन करतो का? ते कितपत आत्मसात करतो?
- सकारात्मक विचारसरणी आम्ही स्वीकारली आहे का? की केवळ तक्रारी व गाऱ्हाणीच मांडत बसतो.

या प्रश्नांची उत्तरे शोधत-शोधतच पुढं जायचं आहे. सबंध वर्षभरात मिळालेली ही शिदोरी आहे. जी आजवर पुरते आहे. इथून पुढेही अनेक प्रश्न निर्माण होऊन आव्हाने देत राहतील, तेव्हाही हीच सकारात्मक अनुभवांची शिदोरी कामी येईल.

* * *

मुख्याध्यापकाची भूमिका ही केवळ मार्गदर्शकाची नसून मित्राची असावी. तशीच अधिकाऱ्यांची. शिक्षक हा वाया गेलेला प्राणी नव्हे ज्याच्यावर निगराणी (करड्या नजरेने) करायला. तोसुद्धा मानव आहे. त्याची ऊर्मी वाढवण्याचं काम यातून व्हावं न की त्यांच्या खच्चीकरणाचं?

गिजुभाई बधेका म्हणतात - "शिक्षक जेव्हा स्वत:ला विसरतो तेव्हाच तो विद्यार्थ्यांचा होऊ शकतो." परंतु आजच्या व्यवस्थेत हे शक्य होतेच असे नाही. म्हणूनच प्रत्येक शिक्षक आपापल्या चौकटीतच शक्य तेवढे धडपडण्याचा प्रयत्न करतोय; मात्र त्यांची म्हणावी इतकी दखल घेतली जात नाही.

* * *

शिक्षकांनीही शिक्षणातील नवनवीन प्रवाह समजून घ्यायला हवेत. शिक्षणातील प्रयोग समजून घ्यायला हवेत. आपल्या नवविचारांना चालना देतच राहायला हवं. जाणून घेणं हे स्वप्न आणि तेच प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करणं हाच ध्यास! त्याबिगर शिक्षणात नवीन वाटा रुळणार नाहीत हेही तितकंच खरं!

खरं तर असे 'आनंदवन' प्रत्येक शाळेत असावं, असं वाटतं. प्राथमिक शिक्षणाचा काळ हा व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंच्या बीजांचं रोपण करण्याचा काळ आहे. त्यातूनच भावी व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण होते, हे आता प्रयोगाअंती सिद्ध झालंय.

मुलांच्या भिन्न-भिन्न व्यक्तिमत्त्वाला घडवताना त्यांना एकाच छापाची समजणं, तयार करणं किती भयानक आहे, याची आपल्याला प्रचीती येईल. पुस्तकाबाहेरचं जग त्यांच्यासाठी खुलं करा. बंदिस्त ठोकळे तयार करण्यापेक्षा जिवंत-रसरशीत रोपटी तयार करणं कधीही श्रेष्ठच!

जोपर्यंत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अशी 'आनंदवनं' बहरत आहेत, स्वत:चं अस्तित्व टिकवून आहेत, तोपर्यंत या कथेला अंत नाही. ती अनंत काळापर्यंत अशीच चालत राहील.

◆





**फारूक एस. काझी**
प्राथमिक शिक्षक
इ. २री च्या पाठ्यपुस्तकात
'मला वाटते'
हा पाठ समाविष्ठ.

मला अशी शाळा बनवायचीय
जिथं प्रत्येक मूल भीतीविना येईल
चुकायला शिकेल
आणि.....चुकांतून शिकेल....
जेव्हा माझा आवाज चढेल....
ते हेच म्हणण्यासाठी...
"ब्रेव्हो, तू करून दाखवलंस....
एकदम झक्कास पिल्या...!!"
माझा हात उठेल तो...
पाठीवर थाप देण्यासाठी....
शिकताना चुकणंही किती मजेशीर असतं
हे त्यांना 'फिल' व्हावं म्हणून....!!!

मला उभारायचंय एक सुंदर पुस्तकालय....
जिथं पोरं पुस्तकांशी खेळतील,
वाचतील, फाडतील.....
बस्स!! मजा करतील !!
जाताना मात्र अनेक स्वप्नं
उरात भरून घेऊन जातील....

मला अशी शाळा बनवायचीय
जिथं स्वप्नं पेरली जातील....
जिथं 'माणसंच' जिपजतील...
मला अशी शाळा बनवायचीय....
'मुलांसाठी शिकण्याची सुंदर जागा'....
शिकण्याच्या वाटेवरचं "आनंदवन"!!!

— फारूक एस. काझी.